म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय का०बी
ग्रा. क्र. १६०८४

IRBK-0116084
IRBK-0116084

8 OCT 1976

8 OCT 1976

23 JUL 1977

28 JUL 19

JAN 1978

1 FEB 1978

17 MAY 1979

16 JUL 1979



मराठी ग्रंथ संग्रहाल

ूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत
ासे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८)
ादा वर्गणी भरावी लागेल.

20 AUG 1975

5 AUG 1975

1 AUG 1975

26 SEP 1975

OCT 1975

OCT 1975

12 OCT 19

5 NOV 1975

Y 19

3 1

25 F

23

F- 2

24 F

2 0

8 M



# फास्टर फेणेचा रणरंग

भा. रा. भागवत

IRBK-0116084

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

© भा. रा. भागवत
१९७५

म–१८३

पहिली आवृत्ती : १९६५
दुसरी आवृत्ती : १९७५

मुखपृष्ठ :
प्रभाकर खानोलकर

आतील चित्रे :
राम वाईरकर

मुद्रक :
श. म. देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनवार पेठ
पुणे ४११०३०

प्रकाशक :
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन
३५ सी, ताडदेव रोड
मुंबई ४०००३४

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ९६०८४ नों. दि ९/६/७५
वि. ७/५/७


## र ण रं गा चा अ नु क्र म


फास्टर फेणेला गुरू भेटतो ... १

शिष्याद् इच्छेत् पराजयः ... १७

फास्टर फेणेला गेंड्याची मदत ... ३२

म्हातारीची कॉफी व फास्टर फेणे ... ४९

अपूर्व काटाकाटी ... ८४

फास्टर फेणे — फू — फू — फू ! ... १०६

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा
दा. क्र. ७६५७९ नो दि ७६.०१
वि. ०१।१७१

# फास्टर फेणेला गुरू भेटतो

नेफातून हिंडताना दूर हिमालयाची बर्फाच्छादित शिखरे ढगांशी स्पर्धा करताना दिसतात. जरा अलीकडे वृक्षाच्छादित डोंगरांच्या काठाकाठाने पांढऱ्या पायवाटा गेलेल्या दिसतात आणि त्याच्याही अलीकडे तराई नावाचा कुरणाचा प्रदेश आढळतो. त्या कुरणातून नुकताच बाहेर पडून– तो पहा, कुणी तरी मुलगा डोंगराच्या कडेकडेने पायवाटेवरून धावतो आहे. कुणी तरी कशाला? तुम्ही त्याला ओळखलेच असेल. आपला बालमित्र बनेश ऊर्फ फास्टर फेणे आहे तो!

पण बन्या आज तितका 'फाष्ट' धावताना दिसत नाही. एक तर त्याच्या दोन हातांत दोन जड बंदुका आहेत; आणि गळ्यात फराळाच्या पिशवीचे लोढणे आहे. शिवाय त्याच्या घोट्याची जखम उलून तिच्यातून रक्त वाहते आहे!

तवांगच्या दक्षिणेला जी-सेव्हन ठाण्यावर झालेल्या धनचक्कर लढाईचे वर्णन तुम्ही वाचलेले आहे. त्या लढाईत फास्टर फेणेने स्वतः भाग घेतला

होता. आपले जवान शौर्याने लढले होते; पण अखेरीस त्यांना ठाणे सोडून माघार घ्यावी लागली होती. इकडे दैववशात् बन्या एकटाच मागे पडला होता. पण त्याने शत्रूकडच्या दोन शिपायांची हाडे– ती पण दैववशात् !– खिळखिळी केली होती. आणि मग त्यांना तसेच कोकलत ठेवून तो त्यांच्या बंदुकांसकट पळाला होता.

शत्रूची नजर चुकवण्यासाठी तो मुद्दामच गवतात शिरला होता आणि आता मैल दीड मैल धावल्यानंतर मगच तो थांबला. अजून त्याचा पाठलाग करीत कोणी आले नव्हते. बहुतकरून त्या ठाण्यावर चिन्यांचे फार सैनिक नसावेतच. जे मूठभर असतील ते आपल्या जखमी मित्रांची शुश्रूषा करण्यात गर्क झाले असावेत. या पोरट्याकडे लक्ष देण्याइतका त्यांना वेळच मिळाला नसावा किंवा तशी त्यांना गरज वाटली नसावी.

बन्याच्या अंगात आता जरा हुशारी आली होती. पण घोट्यातून रक्त वहात होते, म्हणून तो डोंगरकडेच्या एका झाडाखाली थांबला. आपल्या-कडच्या निर्गुंडीसारखी एक वनस्पती या भागात उगवते, तिचा पाला चोळून जखमेवर लावतात हे बन्याला माहीत होते. त्याने तसली वनस्पती ओरबाडून घेतली आणि तिचा रस जखमेवर पिळून तो पाय दाबीत बसला. थोड्याच वेळात त्याला झणझणून बरे वाटले. मग तो विचार करू लागला की आता काय करायचं? काळोख पडायला आला होता, तेव्हा रात्र कुठे तरी काढणे भाग होते. पण तहान लागलेली होती आणि जवळपास पाणी नव्हते. परत खाली उतरून जावे तर– एखाद्या ओढ्याचे पाणी कदाचित् मिळाले असते. पण अंधाराच्या कातर वेळेला त्या दलदलीत उतरणे धोक्याचे होते. आणखी वर चढून जावे तर झाडी खूप. तूण, देवदार नि साल वृक्षांचे शेंडे निळ्या आकाशातून त्याच्याकडे डोकावून पहात होते. त्या निबिड जंगलात सर्प, चित्ते नि तरससुद्धा असतील ! तिकडे जाण्यापेक्षा या पायवाटेने पुढे जाऊन एखादे गाव लागते का ते पहावे हेच बरे.

नुकताच पावसाळा येऊन गेला होता. त्यामुळे वनश्री फुललेली होती. दुतर्फा रंगीबेरंगी फुलांचे निसर्गतः बनलेले ताफे दिसत होते. त्यांत आपल्या खंडाळ्या-लोणावळ्याला न आढळणारी किती तरी विलायती फुले होती. ती पहा— गुलाबी रंगाची सुंदर फुले. दिसण्यात नाजुक असली तरी नाव खूप रानदांडगं आहे त्यांचं. एंप्रेस गार्डनमध्ये वाचलं आहे आपण. काय बरं ?— हो.— रॉडोडेन्ड्रॉन !

फास्टर फेणेला त्या नावाची नेहमीच खूप गंमत वाटे. आता तो एकटा होता, तरी आपल्याशी हसला. इतक्यात "ट्टॉक् !" टुपकन् त्याच्या डोक्यात काही तरी पडले. ते उंबर होते. बन्याने वर पाहिले, तर एक खार मागच्या पायांवर उभी राहून त्याच्याकडे वळून पहात होती. बन्याचे तिच्याकडे लक्ष जाताच ती तुड्तुड्‌ शेंड्याकडे पळाली. बन्या हसला आणि उगाचच एक खडा उचलून त्याने वर मारला. तो त्या खारीला लागणे अर्थात् शक्य नव्हते. एक तर ती केव्हाच पळाली होती आणि बन्याचाही नेम हुकून खडा दुसऱ्याच एका झाडावर आपटला होता. तिथे तो तिसऱ्याच कोणा प्रेक्षकाला लागला असावा. कारण किर्र—किच्च अशी चिडकी आरोळी त्याच्या कानावर पडली. आणि लगोलग जोसात भिरकावलेले पेरूएवढे फळ त्याच्या डोक्यावर आपटले.

"ओय्—" करीत बन्याने ते खाली वाकून उचलले आणि खिशात घातले. जरा पुढे जाऊन त्याने त्या झाडाकडे पाहिले. लिंबाच्या पानांसारख्या चिवट हिरव्या पानांची एक डहाळी बाजूला करून एक पांढऱ्या तोंडाचे काळे माकड त्याच्याकडे पहात होते.

"सॉरी, लंगूरदादा !" फास्टर फेणे सलाम करून म्हणाला, आणि पुढे सटकला. खिशातले हिरवे कच्चे फळ काढून त्याने त्याच्याकडे पाहिले.

फळाची असली जात त्याने कधी बघितलेली नव्हती. कसले बरे फळ असावे हे? आणखी शंभरएक पावले गेल्यावर त्याने डोंगराला वळसा घातला आणि तत्क्षणी एक छोटेखानी गाव त्याच्या नजरेला पडले. बन्याला आनंद झाला.

पाय दुखत होता तरी आपल्याजवळचे जड सामान संभाळीत बन्या तसाच लंगडत निघाला.

गावाच्या शिवेवर एक लाकुडतोड्या मोळी बांधीत होता. त्याला हिंदी येत नव्हते. पण या बंदुकवाल्या मुलाला पाहून तो चकित झाला आणि बन्याला त्याने आपल्या घरी नेले. त्याच्या खोपटात आणखी एक पाहुणे होते. पिवळी वस्त्रे परिधान केलेला, बारीक पण तेजस्वी डोळ्यांचा धष्टपुष्ट संन्यासी होता तो. त्यानेही या बंदुकधारी बालवीराकडे आश्चर्याने पाहिले आणि तो ओरडला, " ओहो ! भारतभूमीका यह नवजुवक वीर कहाँसे आया ? – आवो– आवो, मेरे लाडले बच्चे ! "

त्याचे हे स्वागत जरी बन्याला जरा नाटकी वाटले तरी चांगले हिंदी जाणणारा एक मनुष्य भेटल्यामुळे त्याला फार आनंद झाला. त्याने लगेच उत्तर केले, " आघाडीसे– फ्रंटसे ! जुद्ध देखके आया हूँ ! "

स्वामीजींनी डोळे किलकिले करून त्याच्याकडे पाहिले. पण त्या किलकिल्या डोळ्यांतही जे तेज होते त्याने बन्या मोहित झाला.

" खैर ! वह बाते रहने दो ! " बुवा म्हणाले, " आव. बैट इधर. "

खोपटाच्या पडवीत बन्या मांडी घालून बुवांजवळ बसला. दोन्ही हात आपल्या पुढ्यातल्या बंदुकांवर ठेवून तो त्या दरिद्री घराचे निरीक्षण करू लागला.

एव्हाना आसपासचे चारपाच पुरुष या दोन विचित्र पाहुण्यांना पाहण्यासाठी पडवीत जमा झाले होते. काही न बोलता नुसते यांच्याकडे पहात त्यांनी बैठक मारली होती. एक जण चिलमीचे बार भरीत होता.

एक छोटे कुत्र्याचे पिल्लूही उड्या मारीत तिथे आले. मऊ मऊ पिंगट केसांचा तो सुरेख प्राणी पाहून बन्या फार आनंदला.

" कुणाचा हा कुत्रा ? "

" अपनाही है बेटा ! मेरा ! " स्वामीजी म्हणाले. " चिंटू नाम इसका ! "

" कितना अच्छा है ! " असे म्हणून त्याला डाव्या हाताने जवळ ओढून बन्याने त्याचे मऊ केस कुरवाळले आणि त्याला अगदी गालाशी धरले. कुत्र्यानेही खुषीत येऊन शेपूट हलवायला नि बन्याचे गाल चाटायला सुरुवात केली.

" इतना दोस्ताना हुवा ? " बुवा हसत म्हणाले. " अगर इतना प्यार लगता है तो तूही ले लो इसको. किंमत ज्यादा नही पडेगी– एक बंदूक ! "

" बंदूक ! "

त्याचा गोरामोरा झालेला चेहरा आणि लगेच बंदुकांकडे वळलेले हात पाहून बुवांना गंमत वाटली. ते आणखीच हसून म्हणाले, " तेरी परीक्षा देखी बेटा ! बंदुक मिल जावे तो जरूर चाहिये मुझे. लेकिन तेरी थोडीही हरा लेनी है ? "

" तुम्हांला कशाला हवी बंदूक, स्वामीजी ? "

" कशाला ?– काहेकू ? " बुवांनी डोळे वटारले. पण दुसऱ्याच क्षणी मुद्रा सौम्य करून त्यांनी बन्याचा हात धरला. ते म्हणाले, " जरा बाहर खुली हवामे चल. मै सब कुछ बताता हूँ. लेकिन जल्दी ! मेरा सायंप्रार्थनाका समय हुवा है. "

दोघे पायऱ्या उतरून आंगणात गेले. त्यांच्या मागोमाग लाकुडतोड्या नि त्याचे शेजारीही बाहेर पडले. बन्याने आपल्या दोन्ही बंदुका बरोबर बाहेर आणल्या होत्या. आंगण चांगले सारवलेले होते. कडेला एक प्रशस्त शिळा होती. तिच्यावर बुवांनी बन्याला बसायला सांगितले. स्वतःही बसले. बन्याने चिंटूला मांडीवर घेतले होते. बाकीची मंडळी खाली जमिनीवर बसली होती. मध्येच बन्याचे हात चाट, मध्येच बाबाजींचे कपडे ओढ, असे चिंटूचे उद्योग सुरू होते.



आता रात्र पडली होती. चंद्रकोर पूर्वेला कुठे तरी उगवली असणार; झाडीमुळे ती दिसणे शक्य नव्हते. पण तिचे फिके चांदणे पानांच्या जाळीतून झिरपत होते. जमिनीवर त्याने ठिपक्याठिपक्यांची रांगोळी घातली होती.

चिंटू आपल्या नवीन 'समवयस्क' मित्रावर खूष होऊन गुरगुरत होता.

"बाबाजी बडे साधू है." लाकूडतोड्याचा एक मित्र बन्याला हिंदी भाषेत माहिती देऊ लागला. त्यांचा सर्वच संवाद हिंदीत झाला असला तरी तुमच्यासाठी इथे मराठीतच देतो. "महायान पंथाचे लामा आहेत हे. ग्यालपो रिनपोच्चेचा उजवा हात!"

"कुणाचा?"

"ग्यालपो रिनपोच्चे ऊर्फ लदाई लामा!" तो म्हणाला. आणि एवढ्या थोर पुरुषाला आपण इतके खेटून बसलो आहो याची लाज वाटून बन्या लगेच किंचित् दूर सरकला. पण लामाजी त्याच्याकडे नुसते प्रसन्न मुद्रेने पाहून हसले, तेव्हा त्याचा धीर चेपला.

"अलीकडे किती तरी लामा साधू या भागात येऊन गेले. त्यांनी सभा भरवल्या, प्रवचनं दिली—"

"काय सांगितलं त्यांनी?"

"प्रत्येक लामाने लोकांना खडबडून जागं केलं. त्याचं असं आहे—शत्रू अगदी हाकेच्या अंतरावर आलाय् ना? त्यामुळे लोकांनी शस्त्रांनिशी जय्यत तयारी सुरू केली आहे."

"छान!" बन्या रोमांचित होऊन म्हणाला. "पाहिजेच करायला तयारी! लामा साधूंनी लोकांना आणखी स्फूर्ती दिली असेल?"

“ स्फूर्ती ? ” तो मनुष्य जरा अडखळत म्हणाला. “ हां. तसं म्हटलं तर स्फूर्तीच. पण जरा निराळी. ते साधू म्हणाले– अरे, हे तुम्ही चालवलंय् तरी काय ? शस्त्रांची जरूरच काय इथे ? आणि चिन्यांच्या रणगाड्यांपुढे ही शस्त्रं काय कामाची ! त्या रानदांडग्या पशूंपुढे असल्या हत्यारांचा काय पाड लागणार ! टाका ती शस्त्रं खाली ! तुम्हांला माहीत आहे ना, की आत्मा अमर आहे. त्याला कुण्णी कुण्णी जिंकू शकत नाही ! तुमचं संरक्षण करील तर तो एक परमात्माच ! या बंदुकरूपी काटक्या फेकून द्या आणि परमेश्वराचं चिंतन करा ! म्हणा– बुद्धं सरणं गच्छामि ! ”

“ असं सांगितलं त्यांनी ? ” फास्टर फेणे दातओठ चावीत उद्गारला. बुवा त्याच्याकडे सूक्ष्म नजरेने पहात होते. “ आणि– लोकांनी काय केलं ? ”

“ भराभरा सारी हत्यारं आणून साधूंच्या चरणांवर ओतली. ”

“ मूर्ख बावळट कुणीकडचे ! ” बन्या ओरडला.

इतक्यात लाकुडतोड्याने तावातावाने काही उद्गार काढले. त्याचा अर्थ त्याच्या मित्राने सांगितला तो असा– “ मी मात्र नाही तसं केलं, बरं का ? माझा भाचा शिकारी आहे. त्याची बंदूक अजून माझ्याजवळ आहे. ”

लाकुडतोड्याने बन्याच्या आगमनाची वर्दी दिली होती. थोड्याच वेळात एक म्हातारी जेवणाची थाळी नि पाण्याचा गडवा घेऊन बाहेर आली आणि प्रेमळपणे म्हणाली, “ यह खाव ! ”

भाकरी नि कसले तरी लोणचे होते त्या थाळीत. भाकरी बाजरीचीही नव्हती किंवा जोंधळ्याची नव्हती. दुसऱ्याच कसल्या तरी धान्याची असावी

ती. पण बन्याला तहानभूक कडकडून लागली होती. त्यामुळे आधी घटाघट पाणी पिऊन लगेच त्याने जेवायला सुरुवात केली.

"स्वामीजी, आप नही खाते ?"

"नही, बेटा." बुवा म्हणाले. "मै फलाहार करता हूँ." आणि असे म्हणून त्यांनी आपल्या पिशवीतून एक सफरचंद काढून ते कापले आणि एक फोड बन्यालाही दिली.

बन्याचा राग अजून त्याच्या तोंडावर दिसत होता. "म्हणे साधू !– हेर असणार शत्रूचे, दुसरं काय ?"

"आं ?" बन्याने काढलेली ही शंका ऐकून सर्वच श्रोते चपापले होते. तो माहिती देणारा मनुष्य एकदम म्हणाला, "ऐसे कैसे होगा ?– यह बाबाजी भी एक महान् लामा है !– यह भी कल यहाँ एक सभा लेनेवाले है !"

"नहीं–" बाबाजी एकदम धीरगंभीर स्वरात बोलले. "कलकी सभा नही होगी ! माझा बेत मी रद्द केला आहे. आता तुम्हाला मी माझ्याभोवती जमवलं ते माझ्या अंतःकरणातले बोल तुम्हाला ऐकवण्यासाठी. ऐका !– हा छोकरा जे सांगतो आहे ते सगळं खरं असेल असं मी म्हणणार नाही. काही झालं तरी अहिंसा हा आम्हा बौद्धांचा परमधर्म आहे. तेव्हा त्या लामांनी केलेला उपदेश बहुतकरून चांगल्या हेतूने केला असेल. त्यावरून लगेच त्यांना शत्रूचे हेर म्हणणं बरोबर होणार नाही. पण हा मार्ग मी बौद्ध असलो तरी मला पटत नाही एवढं खरं ! तुम्ही त्यांचं ऐकून शस्त्रं टाकलीत हे बरं केलं नाही ! उचला तुमची शस्त्रं !"

“पण– पण–आहेत कुठे आता आमच्याजवळ?” तो मघाचा बुवा गोंधळून म्हणाला. “त्या साधूमहाराजांनी ती बरोबर नेली. ब्रह्मार्पण करायला!”

“बघा–मी सांगितलं नाही?” तांबड्यालाल डोळ्यांनी त्याच्याकडे पहात बन्या बाबाजींना म्हणाला.

“हं!” बाबाजी उद्गारले. “तेही त्यांनी सद्हेतूने केलं असेल. वाईट झालं! पण थांबा. मी तुम्हाला माझ्याबद्दल सांगणार होतो, नाही का? ऐका–”

आणि मग बाबाजींनी जी हकीगत सांगितली ती अशी—

बाबा मूळचे आमदोचे राहणारे. बन्याने आमदो गाव लष्करी नकाशात पाहिलेले होते. तिबेटच्या ईशान्य कोपऱ्यात चिनी सरहद्दीवर आहे ते. तिथून तरुणपणी चेतांगला आले आणि तिथे लामाची दीक्षा घेऊन मठात राहिले. तीन वर्षांपूर्वी चिन्यांनी तिबेटवर स्वारी करून तो देश काबीज केला. तेव्हापासून ते गावोगाव वणवण भटकत होते. ऑक्टोबरात चिन्यांनी भारतावर आक्रमण केले तेव्हा कमला नदीच्या काठाने पहाड ओलांडून ते तवांगच्या सडकेला लागले होते. तिथे भारतीय सेनेचा आश्रय घेण्याचा त्यांचा विचार होता; पण हिंदी सैन्याने ते ठाणे खाली केले असून चिन्यांनी तिथे कबजा बसवला आहे असे कळताच आग्नेय दिशेला वळून त्यांनी हे गाव गाठले होते.

“इस भ्रमन्तीमे मेरा साथी एकही है– यह चिंटू!” कुत्र्याला गोंजारीत बाबाजी म्हणाले.

“पण– पण–” बन्या किंचित् नवल करीत म्हणाला, “आपको बंदूक कायके वास्ते चाहिये, बाबाजी?”

“ बंदूक?– अगर दुश्मन आवे तो उसका मुकाबला करनेके लिये!”

“ पण– पण–आपण बुद्धभिक्षू आहा ना?”

“ तो क्या हुवा?” बाबाजी उसळले. त्यांचे म्हणणे असे की आपण बुद्धाचे पुजारी असलो तरी अहिंसेचे भलते स्तोम माजवणारांपैकी नाही. कोणी सशस्त्र आक्रमण केले तर त्याचा शस्त्रानेच प्रतिकार केला पाहिजे अशा मताचे बाबाजी होते. चीन आणि भारत या दोन्ही देशांबद्दल बाबाजींना सारखेच प्रेम वाटे, पण तिबेटी प्रकरणापासून चीनने जो रानटीपणा सुरू केला त्यामुळे त्यांना तिथल्या जुल्मी राज्यकर्त्यांचा तिटकारा वाटू लागला होता. तिबेटात आज किती तरी लामा भूमिगत झाले असून चीनविरुद्ध बंडाची गुप्त तयारी करीत आहेत अशी माहिती त्यांनी दिली. खुद्द आपण इकडे आलो आहो ते अशाच एका गुप्त कामगिरीवर, असे सांगता सांगता बाबांनी मध्येच जीभ चावली.

बन्या ऊर्फ फास्टर फेणे त्यांच्याकडे अत्यादराने पहात होता. तो एकदम म्हणाला, “ ज्यादा कहनेकी अगदी जरूरत नही, बाबाजी!” आणि मग स्वामीजींनी विचारण्याच्या आधीच त्याने आपली स्वतःची सर्व हकीगत त्यांना सांगितली. नेफा आघाडीवर आल्यापासून आपण काय काय केले हे तर सांगितलेच; पण तवांग ते धिरांग पीछेहाट होत असताना आपले जवान' किती बहाद्दुरीने लढले; कोणत्या ठाण्यावर किती सैन्य होते; शस्त्रे कशी कमी पडली; पुढे त्याचा कुठून पुरवठा झाला; रसद कसकशी मिळत गेली, याचे इत्थंभूत वर्णन त्याने केले. बुवा मधूनमधून विचारीत होते आणि हा उत्तरे देत होता. काही म्हणता काही त्याने चोरून ठेवले नाही. जी-सेव्हन्-छावणीतून माघार घेतल्यावर भारतीय फौज कोणत्या ठाण्यावर गेली असावी याबद्दलचा आपला तर्कही त्याने सांगितला. आपले तेजस्वी पण बारीक डोळे

आणखीच बारीक करून बुवा लक्षपूर्वक ऐकत होते. शेवटी ते प्रसन्नपणे मान डोलवीत म्हणाले, "बहोत अच्छा !– बहोत अच्छा ! अरे भाई, जरा हार खानी पडी तो उसमे क्या हुआ? फिर लडेंगे ! अवलोकितेश्वर भारतका भला करे !"

आणि मग बाबाजी लाकुडतोड्याला नि त्याच्या मित्रांना आणखी जवळ बोलावून म्हणाले, "देखो भाई !– आता पुढचे बेत ठरवायचे काय ते ! मी उद्या सभा घेणार होतो, ती आता घेत नाही. माझं मन मला सांगतं की, या बहादुर बच्चाच्या रूपाने प्रत्यक्ष भगवंतच माझ्याकडे आला आहे. उद्याच्या उद्या पहाटे मी याच्याबरोबर कूच करणार आणि तेजपूरला जाणार. तुमच्या गावाला शस्त्रं नाहीत ती पुरवण्याची तडकाफडकी व्यवस्था करतो मी. बोला– भारतमाताकी– "

"जय !" सर्वजण ओरडले.

आणि मग बाबाजी प्रार्थनेसाठी उठले. पण त्यांनी सहज आपला हात कनवटीकडे नेला मात्र, त्यांचा चेहरा सपशेल पडला. ते घाबरल्यासारखे होऊन इकडे तिकडे पाहू लागले.

"क्या हुवा, बाबाजी ?"

दोनतीन क्षण बाबाजी काहीच बोलले नाहीत. मग एकदम– "मेरी मंजुश्री !– मेरी प्रार्थनाकी पुस्तक !– कहां गिर पडी ?– "

आणि असे म्हणून सबंध आंगणाची तपासणी करीत ते थेट खोपटाच्या पायऱ्यांपर्यंत गेले आणि वर चढले. त्यांना फारच मनस्ताप झालेला दिसत होता.

इकडे बन्याला दुसरीच काळजी लागली होती. त्याच्या मांडीवर बसलेला चिंटू अंतर्धान पावला होता !

त्यालाही त्याने शोधशोध शोधले, पण तो कुठेही दिसेना.

आणि शेवटी पानापाचोळ्याने भरलेल्या एका दरडीत बन्याला तो दिसला, तेव्हा त्याचे आश्चर्य गगनात मावेना. कारण चिंटूची स्वारी चाफ्याच्या झाडाखाली एका धोंड्यावर उभी होती— नुसती नाही, सर्कशीतल्यासारखी मागच्या पायांवर. त्याने आपली मान मोठ्या मजेशीर रीतीने तिरकी केली होती. एक कान पडलेला होता. आणि बन्याकडे तो अशा थाटात पाहात होता की, जणू त्याला टुकटुक करतो आहे.

आणि टुकटुक करायला त्याच्याजवळ भरपूर कारण होते. त्याच्या तोंडात दाबलेले होते ते कारण.

एक छोटेसे पुस्तक— पॉकेट— बुकच म्हणा ना !

"बाबाजी !" बन्या ओरडला, "वह देखो आपकी प्रार्थनाकी किताब ! कैसा शैतान कुत्ता है यह चिंटू !"

पण दुसऱ्याच क्षणी त्या सैतान कुत्र्याच्या कळवळ्याने बन्याचे अंतः- करण भरून गेले. कारण दुसरेच— एक भयंकर दृश्य त्याच्या नजरेला पडले होते.

चाफ्याच्या झाडावरून एक काळा भुजंग सळसळत खाली आला होता. आणि चिंटूच्या डोक्यावर डंख मारण्यासाठी त्याने आपली भली मोठी फणा उभारली होती.

ती फणा स्थिर होती. यत्किंचितही हलत नव्हती. पण चिंटूचे डोके हलत होते म्हणूनच केवळ नेम साधण्यासाठी भुजंग थांबलेला होता.

पण बन्या ऊर्फ फास्टर फेणे थांबला नाही. तो गांगरला असेल. पण क्षणभरच. मग लगेच त्याने आपल्या पायांजवळ ठेवलेल्या बंदुकांपैकी एक बंदूक उचलली. त्याने बंदूक कधी उडवलेली नव्हती. त्याला 'चान्स'च मिळाला नव्हता. पण उडवताना पाहिली होती खूप वेळा.

आता ती भली जंगी बंदूक त्याने आपल्या खांद्याशी आडवी धरली, डावा डोळा बारीक करून नेम धरला–सैनिक धरतात तसा. आणि सटकन् चाप दाबला.



गोळी सूं सूं करीत गेली आणि भुजंगाच्या फडेत शिरली. त्याचे डोके तिने छिन्नभिन्न केले. रक्ताच्या चिळकांड्या उडाल्या आणि सर्पराजाची देहदोरी तडातडा उडू लागली. अर्ध्या मिनिटात ती ताठ होऊन जमिनीवर पडली आणि सारा खेळ खलास झाला.

भयभीत झालेल्या चिंटूनेही तोंडातले पुस्तक टाकून केविलवाणे भुंकत तडातडा उड्या मारल्या होत्या.

फास्टर फेणे पाचोळ्यावरून उड्या मारीत त्याच्याजवळ गेला आणि त्याला उचलून कुरवाळू लागला.

सर्व ठीक झाल्यानंतर आता त्याच्या मनात आले—'समजा—माझा नेम चुकला असता तर? भुजंगाऐवजी चिंट्याचाच बळी मी घेतला असता— आणि मग माझा बळी भुजंगाने!

बन्याची पहिली आरोळी ऐकूनच बाबाजी धावत तिथे आले होते. त्यांनी आधी झडप घालून आपले पुस्तक उचलले. अतीव समाधान त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होते.

"मेरी पवित्र पुस्तक मिल गयी!—मंजुश्री!" ते उद्गारले. "हिच्या-शिवाय मी जगूच शकत नाही."

"पण बाबाजी, या चिंटूला जवळ घ्या आधी. त्याचं मरण ओढवलं होतं मघाशी. मला भीती पडली होती की त्यालाच गोळी लागते की काय!"

"कैसी लगेगी?" बाबाजींनी एका हाताने चिंटूला उचलीत दुसऱ्या हाताने बन्याची पाठ थोपटली. "तेरे जैसा बर्कंदाज कुमार कभी गलती करेगा?—खैर! चलो. अब प्रार्थना करके सो जाएंगे."

समाधानपूर्वक सर्व मंडळी आपापल्या खोपटाकडे वळली. घरी गेल्यावर लाकुडतोड्यालाही स्फूर्ती येऊन तो आपली बंदूक पाहुण्यांना दाखवावी म्हणून आत धावला होता.

पण खूप शोधूनही त्याला बंदूक सापडली नाही. आणि शेवटी घामा-घूम होऊन तो जेव्हा पडवीत आला तेव्हा बाबाजींची प्रार्थना पूर्ण झालेली होती.

इकडे लाकूडतोड्याची बोबडी वळली होती. त्याच्या तोंडून शब्द फुटत नव्हता.

"अरे, क्या हुवा भई?" बाबाजींनी प्रेमळपणे त्याला प्रश्न केला.

आणि त्याने चाचरत कापत त्यांना काही तरी उत्तर दिले.

बाबाजींनी गंभीरपणे ते ऐकून घेतले आणि बन्याकडे वळून ते सचिन्त स्वरात म्हणाले, "तू म्हणालास त्यात काही सत्यांश असेल की काय असं मलाही वाटू लागलंय्. या भागात चिन्यांचे हेर खरंच वावरताहेत की काय?–"

"का? काय झालं?"

"या माणसाची बंदूक अंगणात सापडली. पण छिन्नविच्छिन्न अवस्थेत. त्याचीच कुऱ्हाड घेऊन कुणी तरी तिच्या ठिकऱ्या उडवल्या आहेत.–खैर! जय अवलोकितेश्वर! हम इसका बदला जरूर लेंगे. तू और मै कलही तेजपूर जानेके लिए निकल पडेंगे. बनेश, तेरी साथ मुझे मिली– कितना आनंद हुवा! तेरे जैसा चेला मुझे कभी नही मिला था. उमरमे छोटा, लेकिन बहादुरीमे बडा!"

असे म्हणत बाबाजींनी बन्याच्या मस्तकावरून हात फिरवला. बन्याचे सर्वांग रोमहर्षित झाले. डोळे आसवांनी डबडबले आणि तो हर्षभराने म्हणाला, "गुरुजी, मै धन्य हूँ.–सचमुच मै भी आपको गुरु मानता हूं."

आणि त्याने एकदम बाबाजींचे पाय धरण्याचा प्रयत्न केला. पण बाबाजींनी स्वतःच खाली बसून त्याचा पाय पकडला– तो दुखरा पाय!

त्याच्या घोट्याची जखम स्वच्छ धुऊन बाबाजींनी त्याला मलमपट्टी केली.

त्या रात्री गुरुशिष्य नात्याची नवी दीक्षा घेतलेल्या त्या विचित्र जोडीला हिमालयाच्या कुशीत शान्त नि सुखाची झोप लागली.

# शिष्याद् इच्छेत् पराजयः

" जलदी आव रे बेटा स्नान करके ! "


" आया, गुरुजी ! " बन्या ओरडला.

बन्या ऊर्फ फास्टर फेणे कोणाला उद्देशून ' गुरुजी ' म्हणत असेल ते तुम्हांला सांगायला नकोच. जी–सेव्हन ठाण्यावर झालेल्या लढाईनंतर बन्या तराईपलीकडच्या जंगलात पळाला होता. तिथे त्याची एका साधुपुरुषाशी ओळख झाली होती. हे साधुमहाराज म्हणजे एक तिबेटी लामा होते. पहिल्याच भेटीत त्यांची बन्यावर बहाल मर्जी बसली होती; आणि बन्याला तर त्यांच्याबद्दल इतका आदर वाटत होता, की त्याने त्यांना आपले गुरू बनवून टाकले होते !

हे बाबाजी साधेसुधे साधू नव्हते. चीनविरुद्ध बंड करायचा विडा उचलून ते निघाले होते म्हणे. आधी तेजपूरच्या सैन्याधिकाऱ्यांना, मग पंतप्रधान नेहरूंना आणि अखेरीस आपले परमदैवत जे दलाई लामा त्यांना भेटायचा त्यांचा बेत होता. अलीकडे काही चिनी हेर लामांचा खोटा वेष चढवून भारतात घुसले होते त्यांचाही बाबाजी निःपात करणार होते.

अशा लढवय्या लामाला आमचा फास्टर फेणे भुलला तर त्यात नवल नाही ! भोळा भाबडा बिचारा ! त्याला काय माहीत की आपल्या डोळ्यांवर हे एक मोहपटल आलेले आहे–सुदैवाने ते लवकरच दूर होणार आहे ! दुसऱ्याच दिवशी पहाटे बन्याला घेऊन आपल्या छोट्या कुत्र्यासह बाबाजींनी तो गाव सोडला आणि आता दहा वाजण्याच्या सुमाराला ही 'गुरुशिष्यां'-ची जोडी एका लहानशा नदीवर येऊन पोचली होती. फास्टर फेणेला या नदीचे नाव माहीत होते–भोराली !

बाबाजींनी काटक्याकुटक्या गोळा करून विस्तव पेटवला होता आणि त्यात आपल्याजवळचे कंद भाजायला टाकले होते. बन्या नदीत आंघोळ करीत होता. किनाऱ्याकडे त्याची पाठ वळलेली होती. आणि तरी पाण्यात डुंबता डुंबता त्याला एकदम असा भास झाला होता की बाबाजी काटक्यांबरोबर दुसरेही काही तरी विस्तवात ढोशीत आहेत. त्याने पटकन् पाहून घेतले. डायरीसारखं दिसतं काही तरी–हो, बरोबर ! बाबाजींचं प्रार्थनापुस्तक तर नाही ? मंजुश्री ? पण–पण–याचा अर्थ काय ? प्रार्थनेचं ते पवित्र पुस्तक बाबाजी जाळायला का निघाले ? काही तरीच !–बरं झालं, आपण पहिलं हे बाबाजींच्या लक्षात आलं नाही !



बन्याला हे एक जबरदस्त कोडेच वाटले. त्याच्या अंगावर काटा उभा राहिला. त्याचे डोळे विस्फारले गेले. तेवढ्यात बाबाजीही मान वळवीत आहेत असा विद्युत्संदेश फास्टर फेणेच्या डोळ्यांनी त्याला दिला आणि त्यांच्याहीपेक्षा शीघ्र गतीने आपली मान वळवून तो जोरजोराने अंग चोळू लागला.

बाबाजी पुन्हा एकदा ओरडले तेव्हा "आया" म्हणून उत्तर देऊन तो काठावर आला आणि चटकन् अंग पुसून त्याने कपडे घातले. मग तो बाबाजींना म्हणतो, "गुरुजी, आपभी स्नान करेंगे नं ?"

"हां-हां-करता हूं, तू जरा यहाँ नजर रखेगा ?"

"जी." बन्याने मान डोलवीत म्हटले आणि लगेच त्या आगोटीजवळ बैठक मारली.

त्याला अगदी हेच हवे होते. खाली बसून त्याने काटक्याकुटक्या सारख्या करीत फुंकरा मारायला सुरुवात केली.

तिकडे बाबाजी नेसत्या लुंगीनिशी नदीत उतरले होते. बन्या आपले काम नीट रीतीने करतो आहे एवढे एकदा पाहून त्यांनी अवलोकितेश्वराचा जयघोष केला आणि पाण्यात डोके बुडवले. तत्क्षणी बन्याने एका हाताने तो जळका लाकुडफाटा बाजूला सारून दुसरा हात खाली घातला आणि पटकन् एक वस्तू बाहेर काढली. त्याच्या हाताला एक लहानसा चटकाही बसला त्या घाईत. पण वस्तू तरी विशेष न जळता बाहेर निघाली. मघाशी आपले लक्ष नाही असे समजून बाबाजींनी पेटलेल्या काटक्यांखाली चपळाईने जी वस्तू ठेवली होती तीच ही हे बन्याने केव्हाच ओळखले.

बाबांचे डोके पुनश्च पाण्यावर निघेपर्यंत त्याने ती वस्तू उजव्या हाताला स्वतःच्या आड लपवली होती आणि पुन्हा काटक्या सारख्या करण्याचे नि फुंकरा मारण्याचे सत्र आरंभले होते.

पण त्या वस्तूकडे त्याचे दुर्लक्ष होते असे मात्र नाही. बाबांनी पाण्यात डोके बुडवले की लगेच हा उजवीकडे मान वळवून त्या वस्तूचे निरीक्षण सुरू करी. बाबाजींनी डोके वर काढले की पुन्हा समोर विस्तवाकडे लक्ष देई. बाबांनी 'बुद्धं सरणं गच्छामि' म्हणून डोळे मिटून ध्यान सुरू केले की बन्याही उजवीकडे वळून त्या वस्तूकडे ध्यान पुरवी. सुदैवाने त्याच्या या चोरट्या कार्यात त्या श्वानसुपुत्राने काही व्यत्यय आणला नाही. बन्याने टाकलेला त्याच्या पिशवीतला शिळा बनपाव खाऊन तृप्त झालेला तो जीव आपल्या पुढल्या पंज्यावर डोके ठेवून केव्हाच शांतपणे झोपी गेला होता.

अशा रीतीने वस्तुनिरीक्षणाची हेरगिरी बन्याने शिताफीने व शीघ्रगतीने पार पाडली. तितक्याच शीघ्रगतीने त्याच्या डोळ्यांवरचे मायापटल दूर होत गेले. फेपरे आलेल्या माणसाला थोबाडीत मारून शुद्धीवर आणावे तशी एक थप्पड त्या वस्तूने फास्टर फेणेला दिली. त्याचा भ्रमनिरास झाला. बुवांनी चढवलेली मायाची कात त्याच्या डोळ्यांपुढून खळकन् गळून पडली. आणि त्यांचे सत्यस्वरूप त्याला बघायला मिळाले. बन्याच्या अंतःकरणात जितक्या झटपट त्यांनी उच्च स्थान पटकावले होते तितक्या झटपट त्यांची तिथून हकालपट्टी झाली. ट्टॉक्! — क्षणमात्र बन्याला दुःख झाले; पण क्षणमात्रच. बन्या आपल्याशी म्हणाला, "काय बघतोय् मी हे? एकंदरीत मी अजून बच्चा आहे, कच्चा आहे हेच खरं. माणसाची मला परीक्षा नाही. पुरता फसलो नि या माणसाच्या जाळ्यात सापडलो!"

त्या तशा स्थितीत आपला चेहरा निर्विकार ठेवणे त्याला किती जड गेले असेल याची तुम्हीच कल्पना करा. थक्क होऊन त्याने डोळे वटारले होते आणि एक आश्चर्योद्गारही त्याच्या तोंडून निघणार होता, पण मोठ्या मुष्किलीने त्याने स्वतःला आवरले होते. तरी पण वरचे दात खालच्या ओठावर दाबून तो पुटपुटला, "अस्सं काय? तेजपूर गाठण्यापूर्वी पुरावा नष्ट करीत होतास काय?"

•

पुन्हा समोर मान वळवताना चेहऱ्यावरचे सर्व भाग पुसून टाकणे बन्याला भाग पडले. तसे करताना त्याला विलक्षण प्रयास झाले. पण पठ्ठ्या त्याही परीक्षेला उतरला. मला वाटतं, बन्याच्या दुसऱ्या कोणत्याही पराक्रमापेक्षा या विक्रमाला एका दृष्टीने जास्त मार्क दिले पाहिजेत. कारण मधूनच डोके वर काढून किंवा डोळे उघडून बन्याकडे सूक्ष्मपणे पाहणाऱ्या बाबाजींना जराही जरी शंका आली असती, तरी त्यांनी त्याच क्षणी त्याचा काटा काढला असता, आणि मग फास्टर फेणेची एकही गोष्ट यापुढे तुम्हांला ऐकायला मिळाली नसती.

माझ्या कुमार मित्रांनो, बन्याने आगोटीखालून ओढलेली ती वस्तू म्हणजे खरोखरच त्यांचे पॉकेटबुक होते. पण त्याला ते इतके दिवस जपत होते याचे कारण ते प्रार्थना-पुस्तक होते म्हणून नव्हे, ती मंजुश्री नसून खरोखरच एक डायरी होती.

नवा अवतार धारण करताना बाबाजींनी आपल्या डोक्याचे नि ओठांचे काटेकोरपणे मुंडन केले होते आणि खाकी वेष फेकून देऊन पवित्र पिवळी वस्त्रे परिधान केली होती. पण त्यामुळे त्यांचे मूळचे 'तेज' लपत नव्हते!

फास्टर फेणेच्या डोक्यात एकदम पाचशे पॉवरचा बल्ब पेटला. त्याला तडकले– की, बनावट लामाचा बीमोड करायला निघालेले हे बाबाजी स्वतःच बनावट लामा आहेत !

आणि मग त्याला एकेक आठवू लागले– बाबाजींचे ते नाटकी बोलणे, आधी लामांची बाजू घेऊन त्यांनी केलेले लटके भाषण अन् मग त्यांच्या-विरुद्ध ओकलेली आग; वगैरे वगैरे.

काल रात्रीचेच पहा ना– आपल्या उशाखालच्या बंदुका कुणी तरी सरकवीत आहे असा भास होऊन बन्या जागा झाला होता. आणि ते खुद्द बाबाजी आहेत असे पाहून त्याला आश्चर्य वाटले होते. पण बाबाजी जेव्हा हसून म्हणाले, "अरे बच्चा ! ऐसी कडक चीज कभी सिरहाने लेते है? माथा दुखेगा न?" आणि प्रेमळपणे त्यांनी आपली मऊ पिशवी त्याच्या डोक्या-खाली सारली, तेव्हा त्याचे समाधान झाले होते. बन्याने निगरगट्टपणे बंदुकां-वर ती पिशवी ठेवली होती आणि उंच उशी करून तो झोपला होता. पण बाबाजींचा बेत त्या वेळी बंदुका लांबवण्याचा होता हेच खरे ! बन्याच्या ते आता लक्षात येत होते. ज्या लाकूडतोड्याच्या खोपटात ते दोघे राहिले होते, त्याचीच कुऱ्हाड घेऊन बाबाजी रातोरात त्याच्या दोन्ही बंदुकांची वाट लावणार होते. खुद्द लाकूडतोड्याची बंदूक त्यांनी अशीच नष्ट केली होती आणि बालंट मात्र शत्रूच्या हेरांवर घेतले होते !

हं: ! हेर !– बाबाजी स्वतःच तर होते शत्रूचे हेर !

आपला हात थरथर कापतो आहे असे बन्याच्या ध्यानात आले–काय करावं या डायरीचं आता? टाकू या का परत ती आगोटीत? हो–त्याला उगीच शंका यायला नको– जळकी डायरी काढून घेतली म्हणून !

पण नको– तसं नको !

बन्याचा डायरी धरलेला हात विस्तवाकडे निघाला होता तो त्याने चटकन् मागे घेतला. त्याला दुसरीच एक कल्पना तडकली होती.

नदीच्या दिशेला एक विद्युत्कटाक्ष फेकून बन्याने आपल्या पँटीच्या खिशात हात घातला आणि आपली स्वाक्षऱ्यांची ती प्राणप्रिय वही बाहेर काढली. बिल्कुल त्या डायरीच्याच आकाराचे नि धाटणीचे होते हे नोटबुक.

पण– पण– ते नष्ट करायचे ? सुवर्णमोलाच्या स्वाक्षऱ्या त्या नोटबुकात होत्या. त्यांची राखरांगोळी करायची ?

होय, करणं भाग आहे. त्या स्वाक्षऱ्या सुवर्णमोलाच्या असतील. पण माझा भारत देश ? त्याचं मोल हिऱ्यामाणकांनीसुद्धा करता येणार नाही. मला सह्या देणारे पुण्यात्मे फार फार वंदनीय असतील. माझी भारतमाता त्या सर्वांहून वंदनीय आहे. या आणीबाणीच्या क्षणाला मी जर ही वही कवटाळीत बसलो तर ते पुण्यात्मेच मला शाप दिल्याशिवाय राहणार नाहीत !

इतक्या झपाट्याने हे विचार बन्याच्या मनातून जात होते की त्याची नुसती कल्पना करायलासुद्धा अधिक वेळ लागेल.

बन्या ऊर्फ फास्टर फेणे आपले नोटबुक विस्तवात टाकणार इतक्यात आणखी एक उपकल्पना त्याच्या मनात तडकली, आणि त्याचा चेहरा उजळला.

' तीनचारच तर स्वाक्षऱ्या आहेत ' तो आपल्याशी म्हणाला. ' तेवढी पानं फाडून घेतली की झालं. ' हा विचार पुरा होण्याच्या आत नोटबुकातली पाने टरकावून त्याने खिशात घातली होती आणि उरलेली वही त्या पेटलेल्या काटक्यांखाली ठेवून दिली होती.

बाबांची डायरी त्याने आपल्या स्वाक्षऱ्यांच्या कागदाबरोबर पँटीच्या खिशात कोंबली हे सांगायला नकोच !

सुदैवाने इतक्या चपळाईने त्याने हे सर्व काम उरकले की, बुवांना यत्किंचित् शंका आली नाही. ते पाण्याबाहेर येताच म्हणाले, “ अरे, निकालो वह कंद ! जल जाएंगे न ? ”

बन्याने विस्तवातले कंद काटकीने ओढून बाहेर काढले आणि ते हाताने उचलण्याचा प्रयत्न केला, तोच त्याचा हात पोळला.

बुवा खो खो करून हसले.

कपडे बदलून आणि ओले कपडे वाळत घालून ते आगोटीजवळ येऊन बसले आणि बन्याला म्हणतात, “ यह तेरा काम नही, बेटा ! ”

आणि मग त्यांतले दोन काळे कंद भराभर सोलून त्यांतला एक त्यांनी खायला सुरुवात केली आणि दुसरा बन्याच्या हातात ठेवला. पण तेवढ्यात काय त्याच्या मनात आलं– तो काळा कंद स्वतःसाठी ठेवून ते पांढरा कंद उचलीत म्हणाले, “ यह ज्यादा मीठा लगेगा. यही ले लो तू बेटा ! ”

बन्याने तो तोंडाशी नेला. पण त्याच्याही तेवढ्यात काय मनात आले कोण जाणे ! कंद आपल्या खिशात टाकून तो म्हणाला, “ फिर खायेंगे ! अभी तो इतनी भूक नही. यह छिल्छी ही अच्छी लगती है. ”

" तो लिच्छी खाव ! " बुवा उद्‌गारले. पण त्यांच्या स्वरात नापसंतीची छटा उमटली होती.

इतक्यात एक जळून काळीकुट्ट झालेली चपटी वस्तू बन्याने काटकीने बाहेर ओढून काढली आणि चकित झाल्यासारखे दाखवीत म्हणतो, " यह देखो क्या मिला, गुरुजी ! छोटी किताबसी लगती है–तुम्हारी मंजुश्रीके जैसी ! "

" आं ? " बाबाजी अर्धा चावलेला कंद फेकून देत म्हणतात, " अरे, कुछ नहीं ! यह होगा कुछ पत्तोंका गड्डा ! " आणि बन्याजवळची काटकी हिसकावून घाईघाईने ती वस्तू त्यांनी विस्तवात ढोसली. हां हां म्हणता जळून तिची पुरती राख झाली. ती झाडाच्या पानांची गड्डी नव्हती अर्थात् बन्याची ती स्वाक्षरींची वही होती. पण बुवाजी संतुष्ट होते. कारण त्यांच्या कल्पनेप्रमाणे त्यांनी स्वतःची डायरी जाळून टाकली होती–आपल्या हेरगिरीचा पुरावा नष्ट केला होता !

न्याहारी करून तृप्त झालेली ती विचित्र जोडगोळी नंतर पुढचा कार्यक्रम आखायला बसली.

बाबाजी म्हणाले, " बेटा, चलो ! अब तेजपूर जाएंगे ! लष्करमे मेरी तू रुजवात कर दे !–चलो, अपने जवानोंसे मिलेंगे ! "

' और उनके गले छाटेंगे ' बन्या म्हणाला, ' अरे दुष्टा ! तुझे मनसुबे मी ओळखले नाहीत असं समजतोस काय ? ' पण हे सगळे मनात, बरं का ? उघड तो एवढेच म्हणाला, " तो चलो, बाबाजी ! लेकिन यह नदी पार करनी होगी न ? "

" तो करेंगे ! पानी ज्यादा नही है यहां. "

" लेकिन–लेकिन–" फास्टर फेणे चतुरपणे अडखळत म्हणाला, " मेरा तंगडा दुखता है नं ? "

"बहादुर बच्चे! बैठ मेरे पीठ पर! मै तुझे उठा लेता हूँ!" असे म्हणून बुवांनी खांद्याला पिशवी अडकवली आणि खाली उकिडवे बसून ते म्हणाले, "बैठ, बेटा!– और चिंटूको–"

बंदुका धरून शिवाय हा चिंटूला हातात कसा धरणार असा बाबाजींना प्रश्न पडला असावा. पण एकही बंदूक त्यांच्या हातात न देता बन्याने तो सोडवला. चळवळ्या चिंटूला त्याने चक्क पिशवीत कोंबले. त्याच्या आरड्या-ओरड्याकडे मुळीच लक्ष दिले नाही. चिंटूचे डोके तेवढे बाहेर ठेवून पिशवीचे तोंड त्याने बंदांनी बांधले. पिशवी खांद्याला अडकवली आणि दोन बंदुका दोन्हींकडे लटकावून तो बाबाजींच्या खांद्यावर स्वार झाला. त्यांच्या दोन खांद्यांवरून दोन पाय पुढे सोडून त्याने बुवांचे डोके हातांनी घट्ट धरले. पण बुवांची हजामत ताजी असल्यामुळे की काय, त्याच्या हातांवर चरचरून काटा उभा राहिला.

बन्याचे ओझे घेऊन बाबाजी पाण्यात उतरले. छातीवर लोंबणारे बन्याचे पाय त्यांनी दोन्ही हातांनी पकडलेले होते. पण अर्धे अंतर गेल्यावर बन्याला असा भास झाला की, त्यांनी एक हात मोकळा केला असून तो हात आपल्या बंदुकीच्या दस्त्याकडे चालला आहे. तत्क्षणी त्याने मागे पाहिले आणि तो भास नसून वस्तुस्थिती आहे अशी खात्री होताच त्याने एक क्षणही फुकट दवडला नाही. बुवांच्या गळ्याभोवती त्याने आपले दोन्ही पाय इतके घट्ट आवळले की, त्यांचा श्वास कोंडला जाऊन ते काही तरी अस्फुट उद्गार काढू लागले. तेवढ्यावरच बन्या थांबला नाही. पाठीवरची बंदूक खेचून काढून त्याने तिची नळी हातात धरली आणि दस्त्याचा सणसणीत रद्दा त्या गुप्त हेराच्या चमनगोट्यावर हाणला.



बन्याची पूर्ण खात्री होती की असे आपण केले नाही तर आपला निभाव नाही. याच्याशी लढायची पाळी आली तर एका क्षणात हा राक्षस आपली चांदी उडवील.

बन्याने मारलेल्या रट्ट्याबरोबर बुवा बेशुद्ध होऊन पाण्यात पडले. रक्ताने नदीचे पाणी गढूळले आणि पिशवीसकट बन्याही पडला. पण दुसऱ्याच क्षणी तो उठला. त्याने आधी पिशवी उचलली आणि मग घाबरलेल्या चिंटूला एकदा गोंजारून त्याला पलीकडच्या किनाऱ्यावर नेऊन सोडले. तिथे भुंकत उड्या मारीत तो थैमान घालू लागला. पण तिकडे दुर्लक्ष करून बन्या झपाट्याने पाणी तुडवीत परत बुवांजवळ आला आणि प्रथम त्यांचे डोके त्याने पाण्याबाहेर काढले. मग त्यांच्या दोन्ही खांद्यांखाली हात घालून त्यांना ओढीत ओढीत त्याने किनाऱ्यापर्यंत नेले. एका झाडाखाली त्यांना आणल्यावर पिशवीतली दोरी काढून त्याने आधी बुवांची मनगटे बांधून टाकली. दुसऱ्या लांबलचक दोरीचे त्याने बुवांच्या पायांना नि छातीला वेढे दिले आणि त्यांचे शरीर झाडाभोवती पक्के बांधून टाकले. दोरी बांधताना त्याने बुवांच्या छातीवर हात ठेवून पाहिला. धडधड चांगली स्पष्ट ऐकू येत होती. बुवा मेलेले नाहीत एवढे कळल्यावर बन्याला बरे वाटले. तो हात चोळीत आता चिंटूकडे वळला.

त्या बिचाऱ्या चिमुरड्या प्राण्याला या एकंदर सुरस व चमत्कारिक घटनेचा काही अर्थबोधच होत नव्हता. आपल्या मालकाला बांधून ठेवल्याबद्दल या गोड पोरावर रागवावे—हो, गोडच नाही तर काय?- मघाशी ते बनपाव नावाचं हडूक दिलंन् ते किती गोड नि माझ्यासारख्या पोराला चावता येईल असं नरम होतं!—की, दोन मिनिटांत उरकलेल्या या एकदम फास्ट सर्कस ट्रिकबद्दल त्याचे कौतुक करावे, तेच त्याला पडलेली समस्या शेवटी बन्यानेच सोडवली. तो म्हणाला, "काही एवढा प्रश्न पडायला

नको ! झालं ते छान झालं !– अरे येड्या ! तो शीशी बुवा होता. कळलं? मी वाव्वा मुग्गा आहे, बरं ?– कम ऑन्, शेक हँड !"

चिंटूने लगेच पुढचा पंजा उचलला. बन्याने हस्तांदोलन केले आणि तो म्हणाला, "आता– शेक बॉडी. आंग हलव तुझं गदगदून ! किती ओला झाला आहेस, बघ ! मी पण थोडा वेळ उन्हात बसतो."

चिंटूने गदगदून आंग हलवले आणि तो बन्याला आणखीच ओले करू लागला. तेव्हा "ए ! अजून शत्रूसारखा वागतोस काय?" असे म्हणून बन्या दूर पळाला आणि एका खडकावर कपडे वाळवीत बसला.

ती क्रिया चालू असता मधून मधून तो स्वतःला म्हणत होता, हेर पकडलास ! पुढे काय करणार त्याचं ? त्याला असाच बेशुद्ध स्थितीत किती वेळ बांधून ठेवणार ? आसपास माणसं पण दिसत नाहीत मदतीला—'

पण चार-पाच मिनिटे गेली नाहीत तोच तो ताडकन् उठून उभा राहिला.

फट्– फट्– फट्– फट्—

फटफटीचा आवाज येत होता— नक्कीच.

होय ! त्याचा तर्क खरा ठरला. आणखी मिनिटभरातच माळरानाच्या त्या वाटेवरून एक फटफटी येताना दिसली. ती चालवणारा इसम एक भारतीय सैन्याधिकारी आहे एवढे बन्याने ओळखले. लगेच तो फटफटीचा वाटेत हात पसरून उभा राहिला. आणि लष्करी थाटात सलाम ठोकून ओरडला, "ठहरिये, साब ! कैदीको चार्जमें ले लो !"

"कैदी?"

"जी हां ! दुश्मनका जासूस."

साहेबांनी फटफटी थांबवली होती तरी आवाज चालू होता. आता त्यांनी एंजिनही बंद केले आणि ते नुसते आश्चर्याने बन्याकडे पहात राहिले.

बन्याने पँटीच्या खिशात हात घालीत झाडाकडे बोट दाखवले. साहेबांनी गटाण्या डोळ्यांनी ते दृश्य पाहिले. आणि ते पुन्हा बन्याकडे वळले. बन्या ऊर्फ फास्टर फेणे याने त्यांच्या हातावर उघडलेली डायरी ठेवली आणि फोटोवर बोट ठेवून तो म्हणाला, "देखिये, साब!"

तेवढ्यात चिंटूने त्या झाडाभोवती काही सपाटेबंद प्रदक्षिणा घातल्या होत्या. मध्येच आपल्या मालकाचे पाय हुंगले होते, बुभुक्कार केला होता. पण मालक दाद देत नाही असे पाहून तो पुन्हा बन्याच्या शेजारी उभा राहून नुसतीच गुरगूर करीत होता. ती गुरगूर म्हणजे कदाचित् त्याच्या भावड्या इमानी मनाची व्यथा असेल!

कमांडरसाहेब किती तरी वेळ त्या फोटोकडे आणि झाडाला बांधलेल्या बुवाजीकडे पहात होते.

"यह अच्छा हुवा!" ते एकदम म्हणाले. "आता असं कर. तू बैस इथं पहाऱ्याला. मी बिश्वनाथ गावच्या छावणीवर जाऊन काही जवानांना पाठवून देतो. ते याला पकडून नेतील. पण– पण– नीट संभाळशील ना रे याला? खरं म्हणजे मीच बसलो असतो याच्याजवळ आणि तुला धाडलं असतं निरोप देऊन! पण– पण– तुला वाहन कुठचं मिळणार? पायी जायला फार उशीर लागेल. बिश्वनाथ गाव इथून पंधरा–सोळा मैल तरी आहे."

"पण मी जाईन की!– मोटर सायकल दिलीत तर!"

"मोटर सायकल?– तू चालवू शकतोस?"

"येस् सर!" फास्टर फेणे ठासून पण नम्र स्वरात म्हणाला.

"ओः!" भुवया वक्र करून साहेब बन्याकडे पहात उभे होते. मग ते एकदम हसून म्हणतात, "माय डीयर लॅड! मला कळलं आता तू कोण ते!– फास्टर फेणे ना?"

फास्टर फेणेची छाती सार्थ गर्वाने फुलली. कमांडरसाहेबांनी 'शेक' म्हणून पुढे केलेल्या हातात त्याने आपला हात मिळवला; आणि मग स्मित मुखाने त्याने साहेबांना काही तरी खूण केली.

बन्या काय म्हणतो आहे ते पुढल्याच क्षणी त्यांच्या लक्षात आले आणि "ओः—ऑफकोर्स!" असे म्हणून त्यांनी दुसरा शेकहँड केला.

करणे भागच होते मुळी. कारण बन्याचा नवा मित्र चिंटू मागच्या पायांवर उभा राहून आपला पुढचा पंजा हलवीत होता.



# फास्टर फेणेला गेंड्याची मदत

लामाचा वेष पांघरून नेफात वावरणाऱ्या चिनी गुप्त हेरावर बन्या ऊर्फ फास्टर फेणे याने मात केली, इतकेच नाही तर हातपाय बांधलेल्या स्थितीत त्याला पकडून दिले, तेव्हापासून त्याचा भाव भलताच वाढला होता. मेजर-साहेबांनी त्याला नि त्याच्या चिंट्या कुत्र्याला बिश्वनाथ गावात आणले ते जवळजवळ वाजत गाजतच. म्हणजे गावाच्या शिवेवरच मिलिटरी बँड होता. त्याला त्यांनी इशारा करताच त्यांनी आधी 'जनगणमन' हे राष्ट्रगीत आणि मग बन्याच्या स्वागतासाठी एक खास गीत वाजवले आणि शेवटी प्रत्येक जवानाने त्याची ओळख करून घेतली. त्या दिवशी त्याला नि चिंट्यालाही– तो बरा अशा वेळी मागे राहील?– इतक्या वेळा हस्तांदोलन करावे लागले की, बन्याच्या मनगटाची हाडे त्यानंतर दोन तीन दिवस दुखत होती. शिवाय त्याची पाठही शाबासकीने रगडून निघाली ती वेगळीच.

मात्र लष्कराने त्याचे जितके कौतुक केले तितक्याच सक्तपणे त्याला मेजरसाहेबांनी ताकीद दिली, "आठ दिवस या गावात पूर्ण विश्रांती घ्यायची. कुठेही कडमडायला जायचं नाही. सुदैवाने हे गाव आघाडीपासून

दूर अंमळ कडेलाच आहे. इथे आराम करून ताजातवाना हो. मग तुला तेजपूरला पाठवून देऊ" असे मेजरसाहेबांनी त्याला बजावून ठेवले.

या जबरदस्तीच्या विश्रांतीमुळे एक मोठा फायदा झाला. त्याची घोट्याची जखम पूर्णपणे भरून आली आणि खाण्यापिण्याची चिंता नसल्यामुळे त्याच्या अंगात नवे रक्त सळसळून लागले.

शरीर धडधाकट झाल्यावर स्वस्थ बसेल तर तो बन्या कसला? ते आठ दिवस त्याने कसेबसे बसून काढले होते. सकाळ संध्याकाळ परेड ग्राऊंड-वरच्या कवायती बघायच्या आणि दुपारी गावातल्या मुलांबरोबर बैठे खेळ खेळायचे. तिथली अशिक्षित पण प्रेमळ मुले बन्याच्या गोष्टीवेल्हाळपणावर खूष होती. बन्या म्हणजे मोठा ज्ञानाचा गड्डा होता असे नाही. पण ती मुले बोलून चालून खेडवळ; आहम किंवा डोंम यासारख्या वन्य जमातीतली. त्यांच्यापेक्षा याला किती तरी जास्त कळत होते. आपला भारत देश केवढा मोठा आहे, नाना जातींचे नि धर्मांचे लोक भारतात कसे एकोप्याने राहतात, आपली राहणी भिन्नभिन्न असली तरी आपला देश नि आपला झेंडा एकच कसा आहे हे तो त्यांना समजावून सांगे. चीनने आपल्यावर स्वारी केली आहे एवढे त्यांना माहीत होते, पण चिन्यांबद्दल काहीच माहिती नव्हती. ती फास्टर फेणेने त्यांना सांगितली. लढाईतले आपले अनुभव सांगितले. आणि त्यांनी कान टवकारून अन् डोळे वटारून ते ऐकले. अलीकडे हे युद्ध सुरू झाल्यापासून सरकारने गावात हिंदीचे झटपट वर्ग सुरू केले होते. त्यामुळे बन्या हिंदी भाषेत त्यांच्याशी बोले ते त्यांना उत्तम कळे, ती त्याला चतुरपणे प्रश्नसुद्धा विचारीत.

"फास्टर फेणे," एक दिवस त्यांच्यातला पंधरा वर्षांचा एक मुलगा

उत्तेजित नेत्रांनी त्याच्याकडे पहात म्हणाला, “तुम बहुत बहुत अच्छा है. तुम शूर जवान है. तुम हमारा लीडर बनो !”

“हरबान !” बन्या उद्‌गारला.

बन्याला ही ‘ आयडीआ ’ एकदम पसंत पडली. म्हणजे त्याला पुढारीपणाची हाव होती असे नाही. पण आपला एक ‘ कंपू ’ असावा असे त्याला फार फार वाटे. त्याप्रमाणे तडकाफडकी जेव्हा दहा मुलांचा एक ‘ कंपू ’ तयार झाला तेव्हा बन्याचा आनंद गगनात मावेना. या कंपूत सहा मुलगे होते आणि चार मुली. मुलांमध्ये सर्वांत मोठा पंधरा वर्षांचा हरबान मोठा हुशार चटपटीत होता. आणि मुलींमध्ये दहा वर्षांची मिरी फटाकडी होती.

मेजरसाहेब खूष होऊन म्हणाले, “यह तो बॉय स्काऊट के कब्स के जैसे हो गया ! नाम क्या तुम्हारी वानरसेनाका ?”

“नाम— नाम— ” बन्याने तरी अजून विचार कुठे केला होता नावाबद्दल ?

मिरी बन्याकडे मोठाल्या डोळ्यांनी पहात म्हणाली, “बन्या कंपू !”

बन्याने नाक मुरडले. पण त्याच वेळी त्याच्या डोक्यात आणखी एक कल्पना चमकली. कंपूतली बहुतेक सर्व मुले चटपटीत असली तरी त्यांची घरची स्थिती फटफटीत होती. एकालाही धड चांगले कपडे घालायला नव्हते. आज तरी एकूण पाच मुलांनी अंगात गंजीफ्रॉक किंवा बनियन घातलेले होते. आणि चारपैकी तीन मुलींच्या अंगातही कुणाचे तरी जुने गंजीफ्रॉक होते. तेव्हा ‘ बन्या ’ जरी नाही; तरी—

"बनियन कंपू !" बन्या ते दृश्य पहात ओरडला. "बनियन हाच आपला युनिफॉर्म !"

"भॉक् – भॉक् !" चिंट्याने अनुमोदन दिले. तेव्हा बन्या हसून म्हणाला, "याला पण शिवला पाहिजे एक बनियन ! हा आपला अकरावा मेंबर आहे !"

आणि त्याप्रमाणे पुन्हा जेव्हा जेव्हा बनियन कंपूचा एखादा खास कार्य-क्रम असे तेव्हा चिंट्यादेखील आपला चट्टेरीपट्टेरी गंजीफ्रॉक घालून येऊ लागला. मेजरसाहेबांनी कंपूचा नेता फास्टर फेणे आणि उपनेता हरबान यांना प्रत्येकी एकेक रायफल दिली.

"रखो– यह मुल्क खतरनाक है ! हिफाजत के साथ रखो अपने पास !"

फास्टर फेणेने तर बंदूक चालवलेली होतीच. हरबान उत्कृष्ट तिरंदाज होता. बर्कंदाज व्हायलाही त्याला चार दिवसांपेक्षा अधिक काळ लागला नाही.

एक दिवस बन्या नि हरबान आपली बेचकी घेऊन ब्रह्मपुत्रेच्या तीरावर नेमबाजी करीत बसले होते. बन्या म्हणत होता—

"कितनी बडी है यह ब्रह्मपुत्रा !– आमची पुण्याची मुळा-मुठा हिच्यापुढे क्षुद्र नाला वाटेल, नाला !– मेजरसाहेबांबरोबर मी इकडे आलो ना, हरबान– तेव्हा पहिल्याने मला हा समुद्रच वाटला. मी म्हणालोसुद्धा, मेजरसाहेब ! भोरोलीसारखा लहानसा ओढा एकदम समुद्राला मिळाला जाऊन ? तेव्हा साहेब हसून म्हणाले, "वेड्या ! हा समुद्र नाही. ही ब्रह्मपुत्रा आहे ! नदी नाही, नद !– पण केवढा राक्षसी नद हा ! पलीकडचं तीर क्षितिजाला भिडल्यासारखं वाटतं !"

"राक्षसी तो हैही!" हरबान म्हणाला, "और इसके अंदर मगर-राक्षसभी बहुत है!"

मगरराक्षस म्हटल्याबरोबर बन्याच्या डोळ्यांपुढे एकदम चिनी सैनिक दिसू लागले. तो हलक्या आवाजात म्हणाला, "मेरा अंदाज है, हरबान–यहाँ नजदीक कहीं दुष्मन आया होगा! तिकडे पश्चिम बाजू तर त्यांनी व्यापून टाकलीच आहे. ही बाजूदेखील ते ढिली सोडतील असं मला वाटत नाही."

हरबान गंभीरपणे मान डोलावून म्हणाला, "मेरी भी वैसीही राय है!"

"इकडे पाकिस्तान अन् ब्रह्मदेश आहेत ना?" बन्या म्हणाला. "आपण भारताची कशी जिरवली हे त्यांना दाखवून दिल्याशिवाय चीन राहणार आहे होय? इथे पण ठाणी बसवायचा प्रयत्न करतील ते!"

"आसामातलं तेल हवंय् त्यांना!" हरबान.

"ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यात या तर खरे म्हणावं–" बन्या उद्गारला, "वाट्टेल तेवढं तेल चोपडतो तुमच्या अंगाला! चंपीच करतो तुमची चांगली!"

"लेकिन–" हरबान म्हणाला, "तू म्हणतोस ते खरं असेल तर उद्या पर्तापगढच्या जत्रेला जायची परवानगी मिळणार नाही आपल्याला."

"मिळेल–मी काढतो कसंही करून!" बन्या म्हणाला. "कंपूला संभाळून नेण्या-आणण्याची जिम्मेदारी माझ्या डोक्यावर!" हे तो बोलायला

आणि त्याच्या डोक्यावर पटकन् एक मांसाचा तुकडा पडायला एकच गाठ पडली.

बऱ्याने समोर आपल्या हातातले बेचके सरसावून वर पाहिले पण झाडा-वर बसलेली घार केव्हाच उडून गेली होती.

"आता आंघोळ करायला हवी." बऱ्या आपल्या डोक्यावरून हात फिरवीत उद्गारला आणि ते ऐकून हरबान खुदकन् हसला.

सुदैवाने त्यांना परवानगी मिळाली आणि दुसऱ्या दिवशी पहाटे उठून बनियन कंपूची मुले समरगीत गात प्रतापगडावर जायला निघाली. बरोबर प्रत्येकाने आपली शिदोरी घेतली होती. आणि चिंट्या सर्वांच्या पुढे उड्या मारीत चालला होता.

पर्तापगढ म्हणताच बऱ्याच्या मनात आपल्या आवडत्या प्रतापगडाचे चित्र उभे राहिले होते. प्रतापगड बऱ्याने पाहिला होता आणि गडाच्या अर्ध्या उंचीवर जिथे शिवाजी महाराजांनी अफझुलखानाचा कोथळा काढला, त्या जागेवर बऱ्याने प्रेम केले होते. पण त्या महाराष्ट्राच्या प्रतापगडापेक्षा हा नेफातला 'प्रर्तापगढ' फार निराळा आहे, बरं का? हा पर्तापगढ म्हणजे बिश्वनाथच्या उत्तरेला आठ एक मैलांवर वसलेले एक मैदानी गाव आहे. तिथे किल्ला वगैरे नाही. एक गढी आहे लहानशी. त्या गढीतच एक महादेवाचे देऊळ आहे आणि देवळात प्रतिवर्षी कार्तिक महिन्यात उत्सव होत असतो. त्याच उत्सवासाठी आज बनियन कंपू निघालेला होता.

"आणखीसुद्धा काही लोक चालले आहेत जत्रेला, बरं का?" बऱ्या रस्त्यावरच्या दुसऱ्या वाटसरूंकडे पाहत म्हणाला.

“अरी भई, यह तो कुछ नही !” हरबानने उत्तर दिले. “दर वर्षी याच्या दसपट लोक जातात. यंदा त्या भागात खतरा आहे ना— त्यामुळे संख्या घटली !”

त्यांची वाट म्हणजे उत्तम गाडीरस्ता होता आणि कंपूचे मेंबर रंगात येऊन गाणी गात चालले होते. त्यांतले एक गाणे मजेदार होते. त्याची पाहिली ओळ मिरी आपल्या मंजुळ आवाजात म्हणे. दुसरी ओळ बाकीच्या मुली किरट्या आवाजात म्हणत आणि तिसरी ओळ मुलगे तारस्वरात ओरडत. चौथी ओळ चिंट्यांची असे. तो नुसता ‘भॉक्–भॉक्’ करी. मग दुसरे कडवे. त्याच्याही ओळी याच क्रमाने म्हटल्या जात—

**“लाल चीनकी पीली चमडी**
**मनका काला रंग !**
**अजीब इसका ढंग !**

**‘भाई भाई’ नारा देकर**
**शुरू किया है जंग**
**अजीब इनका ढंग !**
**भॉक्–भॉक्—”**

आणि शेवटी ओरडून ओरडून घसे दुखायला लागले तेव्हा गाणी बंद पडली. पण मग तोंडाळ मुलांची वटवट सुरू झाली. हिमालयाच्या पायथ्याशी वसलेला आपला हा मुल्ख म्हणजे हिंस्र पशूंचे जन्मस्थान कसे आहे ते हरबान बन्याला सांगू लागला आणि एका रानरेड्याला झिंगायला लावून आपण चिन्यांची कशी दाणादाण उडवली होती ते बन्याने रसाळपणे रंगवून सांगितले.

इकडे जनावरांच्या गोष्टी निघालेल्या पाहून एका कनवाळू मुलीच्या मनात दुसराच विचार आला. चिंब्याचे चिमुकले पाय दमले असणार हे ओळखून तिने त्याला उचलून कडेवर घेतले. आणि लगेच त्याने तिचे तोंड चाटीत म्हटले, "भॉक् – भॉक्!" म्हणजे 'थँक्स!'

"खाली जानवरही नहीं." एक अंमळ नाजुक मुलगा म्हणाला, "झाडं पण पुष्कळ आहेत आमच्याकडे. तुमच्या महाराष्ट्रात असतील का इतकी–"

"हां ना?" एक मुलगी म्हणाली, "फलोंके झाड, फूलोंके झाड, दस लाख है हमारे मुलुकमें–"

"तो हमारे मुलुकमें बीस लाख है–" बन्या म्हणाला. आणि एकदम काही आठवण होऊन त्याने खिशातून एक टणक फळ बाहेर काढले. धिरांगच्या लढाईनंतर तो जेव्हा रानात पळाला, तेव्हा त्याला वाटेत मिळालेले ते एक फळ होते. आता त्याचे टरफल फारच काळे पडले होते. "यह क्या फल है, भगवान जाने!" तो म्हणाला.

"अं:!" चंब्या म्हणाला. "इसका नाम मालुम नहीं? तेरी ऐसी की तैसी!"

"अरी, यह जायफल है!" एका मुलीने बन्याला सांगितले.

"जायफळ?" बन्या उद्गारला. हे साधे फळ आपल्याला ओळखता येऊ नये आणि आपले अज्ञान या मुलांपुढे उघडे पडावे याची त्याला लाज वाटली होती. तो आपल्याशीच विचार करीत होता, 'जायफळ तर मातकट रंगाचं असतं. याचा रंग काळा कसा?'

त्याचा खुलासा हरबानने केला. त्याने त्या फळाची कवची फोडली तेव्हा आतून मातकट रंगाचे फळ निघाले. एका धोंड्याने त्याचेही तुकडे केल्यावर जायफळाचा छान सुवास सुटला.

बन्याने ते तुकडे खिशात घातले. तो म्हणाला, "ठेवून देतो. उपयोगी पडतील."

"कशाला?"

"तुमची जिम्मेदारी घेतली आहे ना मी?—तुम्ही फार वाह्यातपणा केलात अन् त्या काळजीने मला झोप येईनाशी झाली, की एखादा तुकडा चावीन. जायफळाने पटकन् झोप येते, एवढी साधी गोष्ट माहीत नाही तुम्हाला?"

आणि अशा प्रकारे आपल्या अज्ञानप्रदर्शनाचा वचपा काढल्यावर बन्याचा अंतरात्मा संतुष्ट झाला आणि तो पुढचा मार्ग जोरात आक्रमू लागला.

वाटेत बंदोबस्त कडक होता. खांद्यावर बंदुका घेतलेले जवान गस्त घालताना त्यांना दिसले. एकादोघांनी या पोरांना हटकलेही.

"कुठे जाता खतरनाक देशात? बरोबर कुणी बडा आदमी नाही?"

"हम सब बडे है—" चंब्या काही तरी बोलत होता; त्याला मागे सारून फास्टर फेणे म्हणाला, "कमांडरसाहबसे हुकूम लिया है हमने—" हे सांगताना त्याने व हरबानने आपापल्या बंदुकीवर ऐटीत हात ठेवला होता.

गस्तवाल्यांची खात्री झाल्यावर त्यांनी यांना हसून पुढे जाऊ दिले. पण या मोठ्या रुक्ष रस्त्यावरून जायचा कंपूला आता कंटाळा आला होता

त्यांच्या उजव्या हाताला छातीइतक्या उंच गवताचे रान माजलेले होते, आणि त्या रानातून एक भांगासारखी वाट गेलेली दिसत होती. बन्याला वाटले– वस्स ! ही पायवाट धरावी अन् घुसावं गवतात. मग बेहेत्तर आहे ती भलतीकडे गेली तरी ! खड्डयात गेला तो पर्तापगढ !

हरबानचे बन्याकडे लक्ष होते. तो एकदम म्हणाला, "क्यों फास्टर फेणे ? चलेंगे उस रास्तेसे ? पर्तापगढलाच जाते ती पण वाट !"

"अस्सं ? वा ! मग चल की ! चांगला शॉर्ट कट असेल ?"

"हो. शॉर्ट कट आहे. पण एवढं उंच उंच रान. काही जिवाणू-बिवाणू असलं तर आत ? म्हणून जरा बिचकत होतो.–शिवाय बायका आहेत ना बरोबर ?"

"माहीत आहे रे तू मोठा पुरुष आहेस तो !" मिरी त्याच्यावर ओरडली "हम डरनेवाली लडकियाँ नही."

"अच्छा, तो चलो– बहाद्दर लडकियाँ, चलो !"

तमाम वनियन कंपू हरबानच्या मागोमाग त्या गवताच्या झाडीत घुसला.

रानाच्या इथल्या शिवेवरही दोन जवान पहारा करीत होतेच. पण "खबरदारीसे रहना !" एवढेच त्यांनी बजावले.

गवतातून गुरख्यांनी काढलेली ती पायवाट होती. त्या वाटेने अर्धा मैल पुढे गेल्यावर त्यांना एकाएकी पाणथळ जमिनीचा एक पट्टा लागला. चक्क त्यांच्या वाटेतच पाण्याची डबकी साचलेली होती ! आणि त्यांत बसून बेडकांचे समुदाय भूपाळ्या म्हणत होते– किंवा यांना हिणवत होते म्हणा ! एका मुलाने खोलीचा अंदाज घेतला, तो त्याचे ढोपर पाण्यात बुडाले !

म्हणजे रस्ता बंदच झाला होता. दोन्ही बाजूंस गवताचे दाट रान होते. ते गवत बाजूला करूनच आता वाट काढणे भाग होते. त्याप्रमाणे हरबान वळून रानात घुसणार, तोच चंब्या ओरडला, "यह देखो!– इधरसे जायेंगे!"

पाण्यातच थोडा कडेला एक काळा कातळ दिसत होता. त्या कातळा-वर पाय देऊन त्याने पलीकडे कोरड्या जमिनीवर उडी मारली, तेव्हा तीन मुलींनी त्याचे पटापट अनुकरण केले. चौथीच्या हातात चिंट्या होता. त्याला आता कसचे राहवते? 'पुढिलांचे पराक्रम' त्याने पाहिलेच होते. आता त्यालाही स्फूर्ती झाली आणि मालकिणीने पाऊल टाकण्याच्या आधी त्यानेच झेप घेतली त्या खडकावर—

आणि काय आश्चर्य! इतक्या मुलांच्या वजनाने जो खकड हलका नव्हता तो चिंट्याच्या चिटुकल्या भाराने हलला. डळमळला. त्याचे भूशिरासारखे एक टोक वर आले.

"भॉक्–भॉक्–" चिंट्या घाबरून ओरडू लागला आणि पाण्यात बुडी मारून लडबडत पलीकडे गेला. कोणी तरी त्याला उचलले आणि त्याचे भुंकणारे तोंड दाबले. खडकाची ती अनपेक्षित हालचाल पाहून प्रत्येकाच्या तोंडून एक अस्फुट किंकाळी बाहेर पडली.

"ऐ तेरी ऐसीकी तैसी–" हरबान ओरडला. "यह पत्थर नही है!– वह अणी देखी? नोक? वह नोक नही है. नाक है."

"नाक?"

"जी! खंगकी नाक! यह खंग है, खंग!"

"खंग?" बन्याने डोळे बारीक केले.

"खंग" हरबान त्याच्याकडे पहात म्हणाला, "गेंडा."

"बाप रे! गेंडा!" बन्या ओरडला. "पळा– पळा इथून!"



त्याने पटकन् बाजूच्या गवतात उडी मारली आणि दोन्ही हातांनी गवत बाजूला सारून तो हळूच डोकावू लागला. पाच मुलगे नि एक मुलगी त्याच्या पाठोपाठ पळाली होती. पलीकडे गेलेल्या मुलांनीही दूर पळ काढला होता.

इकडे गेंडा उठून उभा राहिला होता. आणि त्याने इतक्या जोराने आपले आंग गदगदून हलवले होते की दोघा-तिघा मुलांना त्यामुळे चांगलाच ' चिखलबाथ ' मिळाला !

बरेच दूर गेल्यानंतर आता गेंडा काय करतो या जिज्ञासेने इकडची ती पाच पोरे गवताआड लपून किलकिल्या डोळ्यांनी त्याच्याकडे पाहू लागली. आपल्या गिड्डया पायांवर गेंडा उभा राहिला तरी अर्धा चिखलात बुडालेला होता. त्याने आपली जाडजूड भेसूर मुंडी हलवून एकदा चौफेर निरीक्षण केले. त्याच्या मद्दड मेंदूत काही प्रकाश पडला नसावा बहुतेक; कारण एक क्षणभर तो स्तब्ध उभा राहिला आणि मग दुतर्फा पांगलेल्या बनियन कंपूकडे पाहण्याऐवजी नाकासमोर कुठे तरी पहात तो गेंगाण्या आवाजात डरडरून खिंकाळला.

आणि खिंकाळणे संपल्यावर त्याने थेट नाकासमोर धडक मारली. बोलून चालून गेंड्याची धडक ती ! अशी गेली थेट, की जशी काही तुफान मेल ! रान तुडवून चोपीत ते अजस्र धूड गवतात जे अदृश्य झाले, ते सबंध कुरण संपल्यावरच याच्या दृष्टीला पडले. तोपर्यंत फक्त गवत चेपीत आखली जाणारी त्याची मार्गरेषाच तेवढी दिसत होती.

आणि आता दूर मोकळ्या मैदानावरून तो बेफाम धावत होता. कशाला ? त्याची ती बेगुमान धडक अजून कशाला चालू होती ? त्याला चिथावणारे बनियन कंपूतले ते दशकुमार तर इकडे या रानात होते. आणि तो रेम्या-डोक्या तिकडे कशासाठी धावत होता ?

डोळे बारीक करून पाहिल्यावर त्याचे कारण बन्याच्या लक्षात आले. गेंड्याच्या पुढे सुमारे अर्ध्या फर्लांगावर एक माणूस धावत होता आणि गेंड्याची स्वारी त्याचाच पाठलाग करीत होती.



"वा वा! वड्याचं तेल वांग्यावर!" बन्या उद्गारला. अर्थात् त्या मराठी म्हणीचा अर्थ त्याच्या सोबत्यांना कळणे शक्य नव्हते. पण सर्वांचीच चौकसबुद्धी आता जागी झाली होती आणि जो तो गवतात उभा राहून त्या पळणाऱ्या माणसाकडे भांबावल्यासारखा पहात होता. त्याच्या अंगातले शेवाळी कपडे पाहून हरबान कापऱ्या आवाजात म्हणाला, "बंदुकवाला जवान मालूम होता है!"

"तो खाली पिली देखते क्यौं हो?" मिरी पलीकडून ओरडली. "बंदूक चलाव! नहीं तो मरेगा बेचारा!"

मिरीच्या त्या शब्दांनी बन्या नि हरबान भानावर आले. दोघांनीही बंदुका सरसावून नेम धरले आणि गोळ्या झाडल्या. पण त्यांतली एकही

गोळी गेंड्याला लागली नाही. एवढ्यात त्या पळणाऱ्या माणसाने त्याला एक झुकांडी दिली आणि बाजूच्या खड्डयात उडी टाकली. गेंडाही बंदुकीच्या बाराने दचकला होता. तो थबकला, बाजूला वळून तिच्याकडे रानात घुसला आणि क्षणार्धात दिसेनासा झाला.

कंपूला एकदाचे हायसे वाटले. त्या माणसाचे काय झाले हे पाहण्यासाठी दहा मुलांच्या वीस तंगड्या धावत सुटल्या. लवकरच त्यांनी तो खड्डा गाठला. खड्डा अंमळ खोलच होता. हरबान खड्डयात उतरला आणि त्याने पाहिले, तर तो माणूस बेशुद्ध पडलेला होता. त्याच्या डोक्याला टोपी नव्हती; पण कपडे सैनिकाचे होते. मात्र तो हिंदी सैनिक नव्हता. रंग, रूप नि वेष सर्व ओरडून सांगत होते की हा भारतीय नाही. हा चिनी माका आहे– दुश्मन !

बन्या, हरबान, मिरी आणि मंडळींनी डोळे तांबारून परस्परांकडे पाहिले. मग बन्या ओरडला, "पहिला उसका काटा निकालो !" आणि स्वतःच एक उडी मारून त्याने त्याची जवळ पडलेली बंदूक उचलली. तो ताठ उभा राहून म्हणाला, "आमच्या जवानांचा पहारा चुकवून हा त्या गवतातनं कुठे तरी जायला पहात होता."

ती बंदूक त्याने चंब्याच्या हातात दिली आणि म्हटले, "तुम और चार लडके इधर बैठो. सख्त पहारा रखो ! त्याला फारसं लागलेलं नाही. शुद्धीवर आला तर गप्प बसायला सांगा. त्रास द्यायला लागला तर दस्ता मारा नि पुन्हा बेशुद्ध पाडा ! – मंगल, तू नि मिरी आणि आणखी एक मुलगा गस्तवाल्या जवानांकडे जा आणि म्हणावं जीप पाठवा ताबडतोब– या कैद्याला न्यायला—"

"और तुम ? – तूही चल की आमच्याबरोबर !" मिरी म्हणाली. "आता पर्तापगढ राहू दे !"

" पर्तापगढ गेलं उडत !" बन्या ओरडला. " मी नि हरबान इकडे जरा हिंडून पाहतो. एकटादुकटा चिनी शिपाई कसा आला इकडे ? खात्रीने एखादं टोळकं असलं पाहिजे ! आम्ही खबर काढून आणतो !"

दोघीतिघी मुली घाबरल्यासारख्या होऊन त्याच्याकडे पाहू लागल्या.

" लेकिन–"

" लेकिन विकिन कुछ नही !" फास्टर फेणेने त्यांना तोडले. " तुम्ही बनियन कंपूच्या शूर मुली ना ? मग अशा डरता ?" असे म्हणता म्हणताच तो नि हरबान पळालेसुद्धा.

" हम हमारे लिये नही डरते– तुम्हारे लिये–"

" हमारी चिंता मत करो !" हरबान लांबून ओरडला. " लेकिन तुम सम्हालके रहना ! कौन जाने, जंगलमें औरभी दुश्मन होंगे !"

" होने दो ! हम उनका मुकाबला करेंगे !" आठ कंठांतून आरोळी आली.

" भॉक्– भॉक्– भॉक् !" नववा कंठ ओरडला.

हरबान आणि बन्या ऊर्फ फास्टर फेणे एव्हाना दूर पळालेले होते. " भॉक् – भॉक् " आवाज फारच जवळून आल्यासारखे वाटून ते क्षणभर थबकले आणि त्यांनी मागे पाहिले.

" अरे शैतान !" बन्या ओरडला. " तू आमचा पिच्छा पुरवणार तर !" त्याने एका हाताने बंदूक सावरीत दुसऱ्या हाताने चिंट्याला उचलून कडेवर घेतले आणि बोटांनी त्याचे तोंड बंद करीत तो म्हणाला, " मात्र अळी मिळी गुप चिळी ! तर यायचं आमच्या बरोबर !"

खड्ड्यातून डोकावणाऱ्या मुलांनी वर पाहिले. चिंट्याला उचलून बऱ्या आपल्याला उचलून 'टा–टा' करतो आहे हे पाहून त्यांचा जीव भांड्यात पडला. मग फास्टर फेणेने सांगितल्याप्रमाणे पाच मुले त्या बेशुद्ध माणसां-जवळ जागता पहारा करीत बसली आणि बाकीची तीन मुले त्वरेने विश्वनाथ गावाकडे निघाली. त्यांचे पर्तापगढ बुडाले असले तरी या अनपेक्षित प्रतापा-मुळे त्यांच्या उत्साहाला पूर आला होता आणि मघाचे ते चिन्यांचे गाणे ती– फार ओरडून नाही, पण– गात होती—

**लाल चीनकी पीली चमडी**
**मनका काला रंग**
**अजीब इनका ढंग**

आणि आता मिरी आपला एक स्वकृत चरण त्याला जोडून म्हणत होती—

**इनके पीछे खंग !**

बनियन कंपूच्या या बहादुरीमुळे आपल्याकडच्या चिनी युद्धकैद्यांची संख्या त्या दिवशी एकाने वाढली हे वेगळे सांगायला नकोच.

# म्हातारीची कॉफी व फास्टर फेणे

नेफा प्रांतातलीच गोष्ट. हातात बंदुका घेऊन दोन मुलगे दबकत दबकत चालले होते. बनियन कंपूचा पुढारी फास्टर फेणे आणि उपनेता हरवान.

विश्वनाथ गावापासून बरेच दूर आले होते ते. खरं म्हणजे कंपूच्या दहा मुलांची ट्रिप निघाली होती पर्तीपगढला जायला. पण वाटेत दुसराच प्रकार घडला आणि पिकलेले फळ हातात टपकावे तसा एक चिनी कैदी त्यांच्या तावडीत सापडला. तेव्हा त्या कैद्याला छावणीवर पोचवण्याची कामगिरी दुसऱ्या मुलांवर सोपवून हे 'वरिष्ठ नेते' आता कुठे निघाले होते, माहीत आहे? चिन्यांच्या चोरट्या चौकीचा शोध काढायला! आणि त्यांच्या मागून धावत होता त्यांचा चिमुकला चतुष्पाद मित्र चिंट्या.

अशी चोरटी चौकी जवळपास कुठे तरी असणार याबद्दल बन्याला मुळीच शंका नव्हती. त्याने मोठ्या गंभीरपणे हरबानला बजावले होते– जहाँ जहाँ पानी वहे, वहीं वहीं झरा आहे ! पळपुटा चिनी दिसला की समजावं, याचं ठाणं इथून दूर नाही.

तिकडे तवांगला लढाई होऊन चिन्यांनी कबजा बसवला असला तरी या पूर्व टोकाला त्यांनी अजून पाय घुसवलेला नव्हता. भारतीय टेहेळी पथके आता डोळ्यांत तेल घालून या भागात वावरत होती.

आणि तरी बेटा हा मुरटा भामटा बारीक डोळ्यांचा जमीनचोर कुठून आमच्या हद्दीत घुसला कुणास ठाऊक ! ते काही नाही– त्याला अद्दलच घडवली पाहिजे. त्याच्या मुक्कामाचा शोध लावलाच पाहिजे. नाही तर याच्या मागोमाग आणखी चिनी यायचे !

"भुआक्–भुआक् !" चिंट्या मध्येच भुंकला. अर्थ : 'मी दमलो की लेका !" लगेच बन्याने उचलून त्याला कडेवर घेतले. आपल्या हातांतल्या बंदुका सावरीत हे दोघे वालवीर आता मोकळ्या मैदानावरून चालले होते. सुमारे दीड मैल अंतर तोडल्यावर त्यांना एक नाला लागला. नाल्याच्या पलीकडे झाडी दिसत होती. एक पायरस्ता त्या नाल्यापर्यंत खाली गेला होता. नाल्याला पाणी थोडे होते; पण जे होते त्यात पाचसहा बायका खडकावर धुणी धूत होत्या. कोणी भांडी भरून घेत होत्या. पलीकडे काताळावर कपडे ठेवून एक चड्डी घातलेला तरुण आंघोळ करीत होता.



म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. नों. दि.
वि.



चांगला गोरा गुटगुटीत होता तो. या मुलांच्या हातांतल्या बंदुका पाहून त्याने एकदम उद्गार काढला, “ वाह्ला ! ” पण मुलांना तो ऐकू गेला नाहीं.

त्या मंडळींच्या बोलण्यावरून बन्याच्या एक गोष्ट लक्षात आली. ती ही

की इथल्या गावकऱ्यांपैकी कुणालाही चिन्याचा मुखडासुद्धा दिसलेला नाही!

म्हणजे चिनी हेर इथे असलेच तर गुप्तपणे वावरत असणार. ठीक आहे! त्यांचा तल्लासही गुप्तपणे काढला पाहिजे. नाल्याच्या पलीकडे ही जी झाडी दिसते तीत लपायला जागा चिकार असणार. आपण दोघे बंदुका घेऊन ही झाडीच विंचरून काढू.

हा विचार बन्याच्या मनात आला आणि नुसत्या नजरेच्या इशाऱ्याने त्याने तो हरवानला कळवला. हरवानने मान डोलवली.

नदीचे स्वच्छ पाणी पिऊन मग त्या ढोपरभर पात्रातून दोघे पलीकडे गेले; आणि तिथला कातळ चढू लागले.

फास्टर फेणेने चमकून उजवीकडे पाहिले. डोक्यावर काटक्यांची मोळी घेतलेली एक जख्खड म्हातारी विगीविगी चालत त्यांच्याजवळ आली होती. बन्याच्या खांद्यावर हात ठेवून ती काही तरी कुजबुजली.

नडियाल जातीची बाई होती ती. पण तोंडावर तेज इतके की अंगावरचा पोशाख चांगला असता तर ही बाई रानटी आदिवासी जातीतली आहे हे कोणाला सांगून खरे वाटले नसते. हिंदी तिला मोडकेतोडकेच येत होते; आणि त्यात आसामी शब्दाची भर होती. तिचे धेडगुजरी बोलणे जसेच्या तसे देणे म्हणजे आमच्या बालवाचकांचा अंत पाहण्यासारखे होईल, म्हणून ते सरळ मराठीतच देतो. सुदैवाने तिच्या मोडक्या हिंदीचा अर्थ फास्टर फेणेच्या मेंदूत विद्युद्वेगाने शिरला.

"तुम्ही पाहिलात तो माणूस?" तिने पहिलाच प्रश्न विचारला होता.

"कुठचा माणूस?"

"नदीत आंघोळ करणारा?"

बन्या आठवून म्हणाला, "बरं, मग?"

"जरा बाजूला या सांगते." असे म्हणून म्हातारीने त्यांना एका झुडपाआड नेले. मग ती आवाज खालावून म्हणाली, "पोरांनो, मी एक गरीब विधवा बाई आहे. माझा मुलगा पिर्तम नुकताच आघाडीवर गेला. दोन छोट्या नातवंडांना घेऊन मी एकटीच राहते माझ्या झोपडीत. आज झोपडीपुढचा केर काढून मी पाणी आणायला नदीवर गेले. परत येऊन पाहते तर एक तरुण गुटगुटीत माणूस दारात उभा. त्याच्या अंगात प्रवासाचे मळके कपडे होते आणि खांद्याला एक पिशवी अडकवलेली होती. तो मुलांशी काही तरी बोलत होता. मला पाहताच तो एकदम म्हणाला, तुम्हांला सांगायला लाज वाटते. पण दोन दिवसांचा उपाशी आहे मी!"

म्हातारीला त्याने जी हकीगत सांगितली त्यावरून तो मूळचा सादिया गावचा राहणारा. चिन्यांनी हल्ला करून तो गाव ताब्यात घेतल्यामुळे त्याने बैलगाडीतून आपल्या माणसांना लखमीपूरला पाठवून दिले. मग स्वतःची कामे आटोपल्यावर तो नि त्याचा भाऊ पश्चिमेकडे निघाले. पण वाटेत चोरांनी त्यांच्यावर हल्ला करून त्यांचा होता नव्हता तो ऐवज लुटला म्हणे. त्यांच्या दुःखात भर म्हणून पुढे या माणसाचा भाऊ आजारी पडला. त्याला कसेबसे सांभाळून त्याने इथपर्यंत आणले होते आणि एका झाडाखाली त्याला निजवून तो खाण्यापिण्याची नि औषधाची व्यवस्था करण्यासाठी हिंडत होता.

एवढे सांगून म्हातारी थांबलेली पाहून हरबान म्हणाला, "बाई, तुम्ही हे सगळं आम्हाला का सांगता आहा?"

म्हातारी म्हणाली, "अरे, आत्ता तुम्ही नदीवर पाहिलात ना—तोच तो माणूस हो!"

बन्या नि हरबान यांची नजरानजर झाली. मग बन्या म्हणाला, "असेल. पण— पण— तुम्हाला त्याच्याबद्दल संशय वाटतोय् का? त्याची हकीगत खरी त्राटली नाही तुम्हाला?"

"हकीगतीचं नाही म्हणत मी. मला चेहऱ्यावरूनच त्याच्याबद्दल शंका आली. तुम्ही नाही ओळखलं त्याला?"

"नाही बुवा!"

"अरे— आमचा पिर्तम फौजेतला सिपाही आहे. तो कधी कधी अखबार घरी आणतो. त्यात— त्या चांडाळ चिन्यांचा राजा आहे ना कुणी— च्येवण लाय—"

"चाऊ— एन्— लाय! त्याचं काय?"

"त्याची तस्वीर आली होती एकदा. आणि हा जो माणूस आज माझ्या दाराशी आला ना, तो हुबेहूब च्येवण लाय वाटला मला!"

"तो माणूस चाऊ—एन्—लाय!" बन्या नि हरबान यांनी ओठ दाबून आपले हसू आतल्या आत गिळले. बन्याची जीभ टाळ्याला लागली अन् आवाज निघाला: "ट्टॉक्!"

"होय. आणि म्हणून हे गुपित मी कुणाही गावकऱ्यांना कळवलं नाही. गावात कुणाच्याही जवळ हत्यार नाही. हा च्येवण लाय असेल तर याच्या मागे जवळ कुठे तरी हत्यारबंद शिपाई असतील— पण तुमच्या हातांतल्या बंदुका पाहून मला धीर आला म्हणून बोलले मी."

हे ऐकून फास्टर फेणेने हरबानकडे पाहून डोळे मिचकावले. मग तो म्हणतो, "आजीबाई, तो कुणी असला तरी चाऊ— एन्— लाय नाही एवढं मी नक्की तुम्हाला सांगतो. अहो, चिन्यांचा पंतप्रधान स्वतः कशाला इकडे येईल? पण— पण—"

"पण काय रे, फास्टर फेणे?" तो अडखळलेला पाहून हरबानने विचारले.

"पण हे जे सादिया गावाचं त्याने सांगितलन् ना? त्याच्याबद्दल शंका येते आहे. सादिया इथून पूर्वेकडे वीस एक मैलांवर– सीमेवरचं गाव आहे. कालच तिथून आपल्या साहेबांकडे तारेचा डिस्पॅच आला."

"म्हणजे ते गाव आपल्याच ताब्यात आहे तर?"

"हो ना! ते चिन्यांनी घेतलं ही निव्वळ थाप आहे. इथल्या लोकांत घबराट उडवायची म्हणून त्याने ही थाप मारली असावी."

फास्टर फेणेला आता जवळ जवळ खात्री वाटू लागली की हा माणूस शत्रूचा हेर असावा. त्याने सांगितलेल्या बहुतेक गोष्टी थापा असल्या तरी एक गोष्ट मात्र खरी असावी. या दोघांची खरोखरच उपासमार झाली असावी. जवळचा शिधा संपलेला असावा. एरवी एवढे गयावया करीत तो म्हातारी-कडे आला नसता.

पण– पण– पण– मग आपल्या ठाण्यावर जाऊन का नाही त्याने शिधा आणला?

उत्तर सरळ दिसते. ठाण्याशी त्याचा संबंध तुटलेला असावा. तसे असेल तर उत्तमच! एकट्यादुकट्या हेरांना पकडणे कठीण जाणार नाही!

हरबानने एकदम विचारले, "बाई! आपल्या आजारी भावाला त्याने कुठे ठेवलं आहेन् ती नक्की जागा विचारायची होतीत तुम्ही त्याला!"

"जागा? नुसती विचारली नाही. मी स्वतः जाऊन पाहून आले." म्हातारी हातवारे करीत अभिमानाने म्हणाली. "ही बुद्धी तशी सहज बनेल

असं समजू नका. मी त्याला म्हणाले, बाबा रे! आमचा पोरगा लढाईवर गेला तेव्हा केलेलं फराळाचं भरपूर आहे घरात. पण परवा वांदरांनी पळवलं. इथं वांदरं भारी सतावतात. तुला नि तुझ्या भावाला मी ताजी रोटी भाजून देईन; मात्र सर्पण पार संपलंय् ते आधी आणायला हवंच. मी तुला नदी दाखवते. तू आंघोळबिंघोळ करून परत येतो आहेस तोवर मी भाकऱ्या भाजते. आणि त्याला नदी दाखवताना मी झाडाखाली बसलेल्या त्याच्या भावाला पण पाहून घेतलं."

"मग? खरोखरीच आजारी वाटला का?" बन्या.

"कुठेशी आहे ते झाड? इथनं दाखवा पाहू—" हरबान.

"ते बघा—" म्हातारीने दाखवले आणि बन्या नि हरबान यांनी तो वृक्ष नीट लक्षपूर्वक हेरून ठेवला. इतक्यात त्यांच्या डोक्यांवरून आवाज आला— "खिं खि खी किच्" आणि लांब शेपट्यांची दोन तीन काळतोंडी वांदरे या झाडावरून त्या झाडावर उड्या मारीत पसार झाली.

"पाहिलंत?" म्हातारी ठासून म्हणाली. "तर त्या भावाचं काय सांगत होते– तो झाडाखाली थैलीला टेकून झोपला होता. अन् कानाभोवती– लो करीचा रुमाल गुंडाळला होतान् खरा."

"पोशाख?"

"पोशाख साधा पांढरा लेंगा नि सदरा स्वेटर—"

"स्वेटरचा रंग?"

"खाकी."

"थैलीचा रंग?"

"तसाच खाकी."

फास्टर फेणेकडे पहात हरबान म्हणाला, "खाकी थैला मिल्ट्रीका होता है. और स्वेटरभी."

"थैलेके अंदर कपडाभी मिल्ट्रीका होगा–" फास्टर फेणे म्हणाला.

"बंदुका होत्या?"

"नहीं! बंदुकवांदुक कुछ नहीं थी."

"होगी–जरूर होगी!" फास्टर फेणे खालचा ओठ दाबून म्हणतो, "बाई, तुम्ही झाडाच्या फांद्यांवर पाहिलंत?"

"ते कशाला पहायला जाऊ मी?" म्हातारी फणफणली. "मला खाली पडलेल्या या वाळक्या फांद्या हव्या होत्या. वरच्या हिरव्या फांद्यांकडे कशाला माझं लक्ष जातंय्?"

बोलत बोलत ही मंडळी म्हातारीच्या झोपडीपाशी पोचलेली होती. झोपडी! फारच एकीकडे होती. आसपास दुसरे एकही घर दिसत नव्हते.

ही नडियाल म्हणजे वन्य आणि अशिक्षित जमात. पण बुद्धीने तरतरीत आणि स्वच्छतेची आवड इतकी, की ब्राह्मणांनी लाजून मान खाली घालावी.

हरबानने म्हातारीच्या डोक्यावरची मोळी खाली उतरवली. इतक्यात तिचे दोघे छोटे नातू धावत धावत झोपडीकडे आले.

"का रे पोरांनो!" म्हातारी गरजली, "घर संभाळायचं सोडून भटकायला गेला?"

"अगो बडी मा!" मोठा मुलगा म्हणाला, "आम्ही दार लावून इथे आंगणात खेळत होतो, तर एकदम मघाच्या पाहुण्याने हाक मारली–"

" म्हणजे? तो तर नदीवर गेला ना?"

" निघाला होता जायला, पण तेवढ्यात परत आला टॉवेल विसरला म्हणून. हाक मारून तो म्हणाला, बच्चे लोक! जरा एक काम करोगे? यह थैला पहुँचा देगे मेरे भाईके पास? आम्ही गेलो. पिशवी पोचवली अन् आताच परत आलो. पण– पण–हे ग काय, बडी मा?"

" अरी भगवान!"

मुले आणि त्याची आजी यांनी आश्चर्योद्गार काढले. याला तसेच कारण होते. घरातले दोन मोठे पितळी डबे उंबऱ्यावर उघडे पडले असून त्यांतला शेवेचा चुरा नि लाडवांचे तुकडे इतस्ततः धूळ खात होते. दोन काळुंद्री माकडे 'किंच्च' ओरडत जवळच्या झाडाकडे पळत होती.

म्हातारी कपाळावर हात मारून म्हणाली, " सत्यानाश कर दिया!– पण–पण– बंद डबे इथपर्यंत आणून माकडांनी कसे उघडले?– पोरांनो, तुम्ही खाऊन झाकणं उघडी तर टाकली नाहीत?"

" नाही– शप्पथ नाही ग आजी!" मोठा मुलगा आश्चर्याने म्हणाला. " यह कैसे हो गया?"

" आम्ही हातसुद्धा लावला नव्हता डब्यांना!" धाकट्याने पुष्टी दिली.

" ही वांदरं ज्यादा हुशार झालेली दिसताहेत!" फास्टर फेणे विचार करीत म्हणाला.

" सारा माल फस्त केलेनी!" म्हातारी ते तुकडे गोळा करीत म्हणाली, " पोरांनो, तुम्हाला द्यायला खाऊच उरला नाही."

“आम्हाला काही नको, आजीबाई!” फास्टर फेणे म्हणाला आणि लगेच हरबानकडे वळून म्हणतो, “इथे नक्की काही तरी काळंबेरं दिसतंय! तू जातोस जरा त्या झाडाकडे?– याच्या भावाचा समाचार घ्यायला? मी इथे आजीबाईच्या सोबतीला राहतो.”

“बहोत अच्छा, लीडरसाब!” असे म्हणून हरबानने खांद्यावर बंदूक टाकून सलाम ठोकला. तशी बन्या म्हणतो, “अरे, बंदुका नको घेऊस. आपल्याला हेरगिरी करायची आहे. अशा वेळी बंदुकीमुळे त्यांना नसता संशय येईल.”

“पण– पण– त्यांनी जर बंदूक रोखली तर काय करायचं?”

“काही रोखीत नाहीत. ते एकटेदुकटे हेर असतील तर आपल्याला भिऊनच वागतील ते.”

बन्याने हे बोलत असतानाच आपली नि हरबानची अशा दोन्ही बंदुका कोपऱ्यात सर्पणाची मोळी ठेवली होती तिच्या खाली सारून दिल्या.

म्हातारी म्हणाली, “आता आधी पाहुण्यांसाठी चहा ठेवते. आणि बाळांनो, तुम्ही पण प्या रे थोडा थोडा.”

आणि तिने लगेच मोळीतली चार लाकडे काढून चुलीत घातली आणि फुंकणीने फुर्रुक फर्रुक करीत जाळ पेटवला; वर आधण ठेवले.

फास्टर फेणे म्हातारीने आंथरलेल्या चटईवर मांडी घालून बसला होता. चुलीत पेटलेल्या जाळाकडे त्याचे लक्ष होते. त्या विस्तवाची धग फास्टर फेणेच्या मेंदूपर्यंत गेली आणि एकदम उठून तो म्हातारीला म्हणाला, “आजीबाई, माझी एक विनंती मानाल?”

म्हातारी आश्चर्याने म्हणाली, "बोल की पोरा!"

"चहाच्या ऐवजी कॉफी करा! तुमचा हा चहाचा प्रदेश. कॉफी तुमच्याकडे असेल की नाही कोण जाणे! पण—"

"अरे हॅट!" म्हातारी गर्वभराने उसळली. "कॉफी पण आहे माझ्याकडे. इतकंच काय, पण मागे माझा पिर्तम् कलकत्याला जाऊन आला तेव्हा कोको पण आणला होता त्याने. वावा रे! आमची हलाखीची स्थिती असली तरी घराणं मजबूत आहे आमचं! पिर्तमचे खापरपणजोबा चांगले श्रीमंत होते. दिकरान नदीत सोन्याचा पहिला शोध लावला तो त्यांनीच. पण बेटा— बोलूनचालून आम्ही हलक्या जातीचे लोक. तुमच्यासारखं थोडंच आम्हाला ते वैभव भोगू देणार? शेवटी आम्ही धुळीला मिळालो अन् पिर्तमचे आजोबा लाकुडतोड्या बनले."

म्हातारीबद्दल बन्याला सहानुभूती वाटत असली तरी तिच्या या चऱ्हाटाचा त्याला कंटाळा आला होता. तो एकदम तोडून म्हणाला, "आजीबाई! ते जातीबितीचं काही सांगू नका! यापुढे तरी जातबीत मानायची नाही असा ठराव झालाय् आपल्या देशात!"

बन्या हे बोलत होता, पण त्याचे सारे लक्ष दुसरीकडेच गुंतले होते. पँटच्या खिशात हात घालून एक गोटीएवढे गुळगुळीत फळ त्याने बाहेर काढले.

धिरांगहून विश्वनाथला येताना बन्याला जंगलात सापडलेले ते फळ होते. झाडावरून पडलेले ताजे जायफळ.

कोपऱ्यात पाटा–वरवंटा होता. बन्या तिथे गेला आणि त्याने ते फळ वरवंट्याने चांगले ठेचले. मग तो चोथा गोळा करून त्याने एका उडीत चूल

गाठली आणि तो चोथा कॉफीच्या आधणात टाकला.

"क्या बात है?" म्हातारी त्याच्याकडे आश्चर्याने पाहात म्हणाली.

उत्तरादाखल बन्याचे बोट नाकाजवळ गेले. त्याने केलेला इशारा म्हातारीला कळला. बाहेर कुणाची तरी पावले वाजली होती.

पण बाहेरून आला तो हरबान होता. हरबान परत आलेला पाहून बन्या त्याला घाईघाईने म्हणतो, "देख लिया ठिकाना?–काय करतोय् याचा भाई?"

"काय करतोय् ते सांगितलं तर डोळे गरगर फिरवशील तू!" हरबान म्हणाला. आणि मग म्हातारीकडे डोळे मिचकावीत म्हणतो, "मी हळूच पाहिलं. झाडाला टेकून बसला आहे. या पोरांनी मघाशी त्याची जी पिशवी पोचवली ना, ती त्याच्या उजव्या हाताशी आहे आणि पठ्या फराळ करतोय्– लाडवांचा नि शेवेचा! आजारी म्हणे!"

"शैतान!" म्हातारी ओरडली. तिच्या कपाळावरच्या शिरा ताडताड उडाल्या.

"छान आहे." फास्टर फेणे म्हणाला. "म्हणजे आपल्या पाहुण्यांचं धाडस जबरं यात शंका नाही! याच घरातले लाडू चोरून, आळ माकडांवर घालून, याच पोरांच्या हातानं चोरीचा माल पोचता केलान्!–ए बच्चे लोग! क्या किया तुमने यह?"

बन्याने कंबरेवर हात ठेवून मोठ्या कुऱ्यात केलेला तो सवाल ऐकून त्या लहानग्या पोरांना ओशाळल्यासारखे झाले. कमांडर रागावला की जवानांची

जशी अवस्था होते, तसे वाटले त्यांना; आणि दोघेही हिरमुसल्या तोंडानिशी बाहेर पळाली.

आणि ती बाहेर पडताहेत तोच बन्याने हरबानचा हात धरून त्याला झोपडीत ओढून नेले आणि तो लगबगीने म्हातारीला म्हणाला, " आजीबाई, याच्याजवळ द्या वाडगाभर कॉफी. पाहुण्याच्या बीमार भावाला पोचवील तो ! "

म्हातारीने कॉफी लवकर उकळावी म्हणून फुंकरा मारून जाळ केला आणि ती हरबानला म्हणाली, " पेडके पास जरा सम्हालके जाना. तिथे एक खड्डा खोदलेला आहे गावकऱ्यांनी– खंग पकडण्यासाठी. "

" खंग ? "

" जी ! आजकाल एक गेंडा फार सतावत असतो आमच्या गावाला. माझा पोरगा घरी असता तर त्याने केव्हाच शिकार केली असती. पण यांच्याने कुठचं ते व्हायला– "

बन्याने मान डोलवली. गेंड्याची शिकार किती कठीण असते ते त्याने जवानांच्या तोंडून ऐकलेले होते. गेंडा नेहमी नाकासमोर सुसाट पळत सुटतो. मागून मारलेल्या गोळीचा त्याच्या चिलखतावर काही परिणाम होत नाही. याडकन् आपटून ती परत येते म्हणे ! पण हुशार शिकारी पायाच्या घोट्यावर गोळी किंवा साधा बाण मारून त्याला घायाळ करतो. मग गेंडा पळायचा थांबतो आणि त्याला मारणे सोपे जाते.

बन्या म्हणाला, " आजीबाई, तो गेंडा अजून मोकळाच आहे. आम्ही पाहिला सकाळी. "

“लेकिन उसने हमको सताया नही.” हरबानने म्हटले, “उसने हमारी साथ की !”

“आजीबाई,” बन्याने पोक्तपणे आपले मत दिले, “त्या गेंड्यापेक्षा हे चीनमधून आलेले मानवी गेंडे वाईट ! चामडी जाड, अन् धडक पण तसलीच.”

“मेंदू पण तसलाच !” उकळलेली कॉफी म्हातारी एका गड्डूत ओतीत होती तिकडे पहात हरबान म्हणाला.

“बरं-बरं !” फास्टर फेणेने त्याला घाई केली. “तू पळ पाहू तो गड्डू घेऊन आधी. ते बघ पाहुणे येताना दिसताहेत.”

“संभाळून जा !” म्हातारीने पुन्हा बजावले. “नाही तर गेंड्याऐवजी तूच पडशील त्या झाकलेल्या खड्डयात !”

हरबान हसला. हात पोळू नयेत म्हणून त्याने गड्डूभोवती आपला रुमाल गुंडाळला होता. तो ‘टा टा’ करीत निघाला. जाताना त्याने फास्टर फेणेला सांगितले, “बाका वख्त आवे तो शिट्टी बजाऊंगा !”

हरबानची शीळ बनियन कंपूत प्रसिद्ध होती. तितकी जोरदार आणि कर्कश शीळ दुसऱ्या कोणालाही वाजवता येत नसे. नेफा भागात एक भुऱ्या रंगाचा बगळा असतो. त्याच्या कर्कश शिट्टीची ती सहीसही ‘कॉपी’ होती.

हरबान पन्नास पावलांवर जातो न जातो तो पाहुणे झोपडीपाशी येऊन दाखल झाले. त्यांनी आपला ओला टॉवेल नि चड्डी बाहेरच एका झाडाच्या फांदीवर पसरून दिली आणि ते आत येत म्हणाले, “बहोत आच्छा हो गया ! तुम्हारी यह नदी बहोत बहोत अच्छी है माईजी ! हम प्रच्छन्न हो

गये !" पाहुणे हिंदी झकास बोलत असले तरी चिन्यांसारखी किचकिच होती त्यांच्या उच्चारात.

"क्यों ?" फास्टर फेणेने विचारले. "तुम्हारी भूक भी प्रच्छन्न हो गयी ?"

त्या माणसाने आपले बारीक डोळे शक्य तेवढे विस्फारून बन्याकडे पाहिले. छोट्या चिंटूने मान कलती करून पाहुण्यांना निरखले आणि 'भॉक्–भॉक्–' केले. म्हणजे तो म्हणत होता, "का रे माझ्या दादाकडे रागावून पाहतोस ? पोटरीचा लचका तोडायला हवाय् का ?"

होता खरा बराचसा चाऊ–एन्–लायसारखा. गोल गरगरीत देखणा चेहरा. जाड भुवया, बारीक डोळे. पण वयाने पुष्कळच कमी– चाऊचा मुलगा शोभण्यासारखा.

"कदाचित् असेलही." फास्टर फेणे स्वतःशी पुटपुटला.

पाहुणे अजूनही बन्याकडे रोखून पहात होते. ते आता म्हणाले, "क्यौं बच्चे ! तुम्हारा दोस्त कहाँ गया इतनी जल्दी करके ?"

"कॉफी पहुँचाने गया–" बन्या ओठ चावीत म्हणाला.

"तुम्हारे भाईकी सेवामें."

"अच्छा ! तारीफकी बात है ! तुम्हारा नाम ?"

"फास्टर फेणे." बन्या ताडकन् म्हणाला. "हम शेतकरीके बच्चे हैं– फार्मरके."

म्हणजे 'मी सैनिकबियनिक नाही' असे त्याला बिंबवायचे होते. हो ! उगाच गैरसमज नको ! ठकाला महाठक झाले पाहिजे.

" तुम फार्मर हो– तो बंदूक काय के लिये तुम्हारे पास ? "

" बंदूक ?– अरेच्या ! याने पाहिलीन् वाटतं ! "

" तुम और तुम्हारा वह दोस्त– दोनोंके पास बंदूक थी न !– नदीपर देखी मैंने ! वह काहेके लिये ? "

" आ ?– वह बंदूक ! " फास्टर फेणे हसल्यासारखे करून म्हणतो, " वह तो एअरगन थी, जरा पंछीको हटानेके लिये ! ( मनात– तुम्हारे जैसे घुबडको ! ) यहाँ माईजीके घर आतेही फेक दी वह एअरगन ! "

" अच्छा ! " तो बुवा चटईवर मांडा ठोकून बसला आणि गालातल्या गालात जीभ घोळवीत म्हणतो, " बंदूक फेकने की जगह भी बहुत अच्छी है तुम्हारी !– लकडीके नीचे, आँ ? "

पाहुण्यांचे लक्ष मोळीखाली सारलेल्या बंदुकांकडे इतक्या चटकन् गेलेले पाहून बन्याला नवल वाटले. फारच धूर्त दिसतो हा माणूस एकंदरीत. कोल्हा कुठचा !

पण त्याला रागही आला. फार फार राग आला. आतापर्यंत त्याने जे नाटक चालवले होते ते पुढे चालवण्याचेही भान त्याला आता राहिले नाही. तो एकदम उसळला, " देखो, साब ! मेरी बंदूक हो या संदूक हो, तुमको क्या करना है ? यह मेरा देश है– मैं बंदूक रखूंगा, तोप रखूंगा, रणगाडा रखूंगा– "

त्या बुवाने एकदम खो खो हसायला सुरुवात केली, तेव्हा फास्टर फेणेचा वाक्प्रवाह तिथेच थांबला. पाहुण्याने जवळ येऊन त्याची पाठ थोपटली आणि तो म्हणाला, " बडे बहाद्दर है तुम ! अरे, तेरा देश है तो मेराभी है, भैय्या !– अच्छा ! माईजी, कॉफीका तो बहुत अच्छा स्मेल जाता है ? हमे कब मिलेगी ? "

" अभ्भी ! " असे म्हणून म्हातारीने एका मोठ्या वाडग्यात ती कॉफी गाळली आणि पाहुण्यांना दिली. पाहुणे म्हणाले, " बेटा, तू भी ले थोडी. "

" यही ! हमने पी ली ! " असे म्हणून बन्या मागे हटला आणि भिंतीला टेकून पाहुण्याकडे पहात राहिला.

पाहुणे कॉफी पीत असताना बन्याचे संपूर्ण लक्ष त्यांच्याकडे लागले. होते. " जरा कडक लगती है– " असे म्हणत म्हणत पण कॉफीचा संपूर्ण वाडगा त्यांनी घशाखाली घातला आणि ते तोंड पुशीत म्हणाले, " शुक्रिया, माईजी ! अब तुम रोटी पकाना ! हम जरा आराम करेंगे. " आणि पुढे निर्लज्जपणे म्हणतो, " बडी दुःखकी बात है कि बंदरोंने आकर तुम्हारे शेव–लड्डू खा डाले !– मैंने दूरसे देखा, लेकिन कुछ कर सका नहीं !

" हं: ! चलताही है ! " म्हातारी पिठात पाणी ओतीत म्हणाली, " यह तो हमेशाका मामला है इधर ! "

खरे सांगायचे तर तिचेही लक्ष पीठ मळण्यात नव्हते. आपल्या पाहुण्याकडे ती मधूनमधून चोरून बघत होती. बन्याप्रमाणे तीही उत्सुक बनली होती.

दोघांची उत्सुकता लवकरच फळाला आली. जायफळाला आली म्हणा ना !

जागे राहण्याचा पाहुणे खूप प्रयत्न करीत होते, तरी त्यांचे डोळे मिटायचे थांबेनात. अखेरीस ते पुरते मिटले. पाहुण्यांना अगदी डाराडूर झोप लागली.

चेष्टा नाही. दोन–तीन कप कॉफीत सबंध जायफळ कुणी कधी घातलं आहे ?

एक दोन मिनिटे वाट पाहून फास्टर फेणे उठला. खुंटीवर सुंभाच्या दोऱ्या टांगलेल्या दिसत होत्या. त्या त्याने ओढून घेतल्या. पाहुण्यांनी तण्णावून दिली होती ती फारच सोइस्कर रीतीने. त्यांच्या हातांनी दारातल्या खांबाला जवळजवळ विळखा घातलेला होता, तर त्यांचे पाय खोलीतल्या घुसळखांबाला टेकले होते.

बन्याने म्हातारीला खुणावून एक दोरी तिच्याकडे फेकली आणि दुसरी आपण घेऊन त्याने पाहुण्यांच्या उशाकडे उडी मारली.

हां हां म्हणता त्याने त्यांचे हात खांबाला करकचून बांधले. म्हातारीला इतक्या चटकन् आपले काम करता आले नाही. कारण ती आपल्या दुबळ्या खरकट्या हातांनी दोरी गुंडाळायला जाते तो पाहुण्यांनी झोपेत पाय झाडले. म्हातारीला एक-दोन लाथा बसताच ती मागे सरली. पण तेवढ्यात बन्या उडी मारून तिथे आला. तो मुळी सरळ पाहुण्यांच्या पायांवर बसला आणि दोरीने ते वळवळ करणारे पाय जखडून टाकले.



हा पराक्रम पाहून चिंट्या बेहद्द खूष झाला आणि नाचून भुंकून त्याने झोपडी डोक्यावर घेतली.

एव्हाना पाहुणे अर्धवट जागे झाले होते आणि चकित होऊन त्यांनी काही तरी बडबड सुरू केली होती. त्या बडबडीला चिंगलिंगची नि टांग-मांगची भरपूर फोडणी होती; त्यावरून त्या शब्दगंगेचा उगम कोणत्या देशात झाला असेल ते सांगणे कठीण नव्हते.

पण बन्याने त्या बडबडीकडे बिलकुल लक्ष दिले नाही. पाहुण्यांच्या तोंडात बोळा कोंबून त्याने शांतपणे त्यांचा कंबरपट्टा नि खिसे चाचपून पाहिले. एक चाकू, एक डायरी नि पिस्तूल एवढ्या जिनसा त्याने 'जप्त' केल्या.

पाहुण्यांना आता आपण होऊन सुटणे अशक्य आहे एवढी खात्री होताच बन्या हात झटकीत उठला आणि गडबडीने म्हणाला, "आजीबाई, आता रोट्या बडवणं राहू द्या. आधी याला बडवलं पाहिजे. इथे पाटील किंवा पोलिस फौजदार तरी असेल ना?"

"दोन मैलांवर आहे."

"मग दोन मैल पळा. किंवा वाटेतच तुम्हाला एखादी जवानांची चौकी लागेल. तिथे वर्दी द्या. म्हणावं घमेलं घेऊन या, हा कचरा गोळा करायला! दरम्यान आमचा हरवान दुसरं सावज ओढीत आणील, त्याची मी वाट बघतो!"

उत्तेजित मुद्रेने फास्टर फेणे बोलत होता. त्याला अभिमान वाटायला सबळ कारण होते. बनियन कंपूच्या नेत्याने एकाच दिवसात केलेली ही दुसरी शिकार होती.

आणि फास्टर फेणेचा उत्साह हा एक संसर्गजन्य ' रोग ' होता. फास्टर फेणेसारखा तो उत्साहपण धावत सुटायचा आणि दुसऱ्यांच्या मानेवर बसायचा.

सत्तर वर्षांची ती जख्खड म्हातारी पण आज उत्तेजित बनली होती. ताठ उभी राहून ती बन्याकडे तेजस्वी डोळ्यांनी पहात होती. तिने कंबर कसली आणि हात न धुताच ती बाहेर पडली. तिच्या रोड तंगड्या दुखत होत्या. पण वाटेत कुणी भेटले नाही तर आज दोन मैल पळण्याची तिची तयारी होती !

" छ्या: ! अजून याचा पत्ता नाही. करतोय् तरी काय ? " फास्टर फेणे पुटपुटला.

अर्धा तास झाला तरी हरबान आला नाही, किंवा त्याची खुणेची शीळ-सुद्धा ऐकू आली नाही, तेव्हा बन्या अस्वस्थ बनला. एकंदर प्रकार काय आहे ते स्वतःच जाऊन पहावे असे त्याने ठरवले. झोपडीत चिनी सैनिक मुसक्या बांधलेल्या अवस्थेत गाढ झोपला होता. अजून गावकऱ्यांनी त्याचा ताबा घेतलेला नव्हता. पण घेतील—आणखी पाच-दहा मिनिटांत येईलच कुणी तरी. त्याच्यापासून आता धोका नाही एवढी बन्याची खात्री होती. त्याने एकदा जीभ काढून त्याला वेडावल्यासारखे केले आणि चिंट्या कुत्र्याला घेऊन तो बाहेर पडला. झोपडीला त्याने कुलूप लावले, किल्ली तिथेच एका खिळ्याला लटकावून ठेवली आणि तो निघाला.

लपत छपत जाऊन त्याने तो वृक्ष गाठला तेव्हा त्याला एक अनपेक्षित दृश्य दिसले.



ज्या बाजूला चिन्याचा भाऊ आजाराचे ढोंग करून झाडाला टेकला होता, त्याच्या अर्थात् विरुद्ध बाजूने फास्टर फेणे गेला. त्याला फार जपून चालावे लागत होते. पाऊल न वाजवता दबकत दबकत. कडेवर चिंट्या होता. त्याने फुकटचे भुंकून विचका करू नये म्हणून बन्याने रुमालाने त्याचे तोंड दाबले होते. आणि त्याचा राग येऊन चिंट्या चुळबुळ करीत होता.

तो एका विस्तीर्ण आणि डेरेदार वृक्षाजवळ आला. जमिनीपासून पुरुष-भर उंचीवर त्याच्या काळ्या कुळकुळीत फांद्या आडव्या तिडव्या पसरलेल्या होत्या. जिथून त्या फुटल्या होत्या, तिथे एक लांबरुंद खोबणं होती आणि तिच्या अगदी काठाशी, आता पडतो की मग पडतो अशा स्थितीत एक मुलगा कुशीवर झोपलेला होता!

तो मुलगा कोण होता हे बन्याला कळून चुकले आणि तुमच्याही ते लक्षात आले असेल.

वनियन कंपूचा उपनेता हरबान होता तो!

बन्याने 'ट्रॉक्' केले.

बन्याला इतके आश्चर्य वाटले की, एक क्षणभर तो नुसता खांबासारखा उभा राहिला. हेरगिरीसाठी बाहेर पडलेला हा पोरगा झाडावर झोपा काढतो याचा अर्थ काय?

इतक्यात दुसरी एक गोष्ट त्याच्या ध्यानात आली. हरबान पडला नसता. त्याचे हातपाय दोरीने फांदीला बांधले होते आणि खालच्या बाजूस जमिनी-वर एक गड्डू पडलेला होता.

म्हणजे?— हरबानसाहेब स्वतःच प्याले की, काय कॉफी? की त्याला या चिन्याने बळजबरीने पाजली? पण— पण त्याला काय माहीत या कॉफीत अमली पदार्थ आहे म्हणून?

क्षण दोन क्षण विचारात घालवून बन्या विगीबिगी त्या झाडावर चढला आणि त्याने हरवानच्या दोऱ्या सोडून त्याला मोकळे केले. मग तो त्याला हलवून जागा करणार इतक्यात त्याला डुकराचे ओरडणे ऐकू आले.—नाही. ते डुकर नव्हते. झाडाखाली बसलेला तो खादाड बुवा ढेकर देत होता. पण काही असो, फास्टर फेणे चपापून मागे झाला आणि त्याने चिंट्याला कवटाळीत खाली उडी टाकली.

त्याची उडी जिथे पडली तिथे बरीच वाळकी पाने होती. त्याचा एक पाय पक्क्या कठीण जमिनीवर पडला होता; पण दुसरा पाय मात्र त्या पानांच्या ढिगात अंमळ खोलच गेला होता.

त्याच्या पायाला तो स्पर्श जरा चमत्कारिक वाटला. त्याने आपले पाऊल अंमळ जोर देऊन दाबले तो ते भसकन् कुठे तरी खाली गेले. लगेच बन्या चिंट्यासकट मागे झाला. त्याने वेळीच स्वतःला सावरले म्हणून बरे झाले. कारण जरा लक्षपूर्वक पायांखाली पाहिल्यावर त्याच्या ध्यानात आणखी एक गोष्ट आली.

बन्याने ओळखले की, आपल्या पुढ्यात जी वाळकी पाने नि गवत पडलेले आहे ती निसर्गरचना नाही. मुद्दाम कुणी तरी हे इथे विखरून ठेवले आहे आणि त्या पानांखाली बारीक काटक्या कुटक्या दिसतात पहा. नुसत्या नाहीत. एखादी चटई विणावी तशा. काटक्यांची एक ताडपत्रीच दिसते खाली ताणलेली. त्या ताडपत्रीच्या चिरांमधून खाली मातीबिती दिसत नाही. पोकळी दिसते. अंधार दिसतो.

हा खूप खूप खोल असा खड्डा असणार नक्की!—बरोबर! म्हातारीने सांगितलं होतं की गेंड्याला पकडण्यासाठी गावकऱ्यांनी एक चर खोदलेला आहे. तो चर किंवा सापळाच असणार हा!

बन्या पुन्हा ताठ उभा राहिला. एखाद्या पुसट कल्पनेचा उदय होताना व्हावी तशी त्याच्या मनाची स्थिती झाली होती; आणि अंगावर थरथरून रोमांच उभे राहिले होते. चिंट्याच्या तोंडावरचा त्याचा हात सैल पडला होता आणि ती संधी साधून चिंट्याने भुंकण्यासाठी तोंड वासले होते. पण बरे झाले– बन्या तेवढ्यात भानावर आला आणि त्याने ते तोंड चिमट्यात धरावे तसे दाबले. चिंट्याने घशातल्या घशात गुरगुर करून तंगड्या झाडल्या व निषेध प्रगट केला.

"थांब जरा–" बन्या त्याच्या कानात म्हणाला, "तुला लवकरच चान्स देणार आहे मी !– हे बघ, तुला त्या झाडाखाली बसलेला बुवा दिसतो का? त्याची पाठ?"

"घुर्–र्–र्" चिंट्याने घशातल्या घशात उत्तर दिले. त्याला दिसत होता तो बुवा. आजारी कसला? चांगला धष्टपुष्ट होता ! तो 'च्यवणलाय' तर हा 'माँ ची टूं !' आणि बुवाच्या शेजारी ती पिशवी होती ती पण चिंट्याला दिसत होती. पिशवीचे तोंड खुले होते. बुवाचा हात तीत नुकताच शिरला होता. त्यांचा टिफिन टाइम झाल्याची ती चिन्हे होती.

ते दृश्य पाहून चिंट्याच्या तोंडाला पाणी सुटले. पण ते त्याने आतल्या आत गिळले. कारण हा त्याचा खवीस मालक त्याला तोंड कुठे उघडू देत होता? नुसती आवळलेल्या पायांची वळवळ करणे याखेरीज बिचाऱ्याच्या हातात काय होते? फार फार चिडला होता चिंट्या. कारण त्याला सपाटून भूक लागलेली होती. आणि नसती भूक लागलेली असती तरी त्याने अशीच वळवळ केली असती. पुराणापासून मटणापर्यंत कुठचाही खाद्यपदार्थ दिसला की त्याच्यावर झडप घातल्याखेरीज चिंट्याला राहवत नसे. पण हा बन्या

लेकाचा हुकुमशहा– आणि म्हणे आम्ही लोकशाही भारताचे स्वतंत्र नागरिक ! माझी मुस्कुटदाबी करताना याला–

चिंट्याचे ते स्वगत लेक्चर तिथेच थांबले. कारण बन्या त्याच्या कानात म्हणत होता, " हो ! ती पिशवीच आणायची तू. सबंध पिशवी ! पण कुठे आणशील? इथे ही बघ तुझ्यासाठी बैठक घालतो छानदार. इथे बसून आपण दोघांनी खाऊ खायचा हं मजेत ?" असे म्हणून बन्या झाडापासून विरुद्ध दिशेला गेला. खड्ड्याच्या कडेने फार फार जपून पावले टाकीत तो पलीकडच्या काठापर्यंत जाऊन थांबला. तिथे त्याने आपला रुमाल जमिनीवर आंथरला आणि मग चिंट्याला पुन्हा त्याने बजावले, " इथे येऊन मग खाऊ खायचा !" आणि स्वतः बन्यादेखील त्या रुमालाच्या मागे मांडा ठोकून बसला.

इकडे आपला मुक्तिक्षण जवळ आलेला पाहून चिंट्या भयंकर अस्वस्थ बनला होता. खुक–खुक करीत त्याने सर्व सूचनांना संमती दिली होती. बन्याने त्याला खाली सोडले न सोडले तोच भराभरा उड्या मारीत तो त्या झाकलेल्या खड्ड्यावरून पलीकडे गेला. मात्र त्याला इतका अमर्याद आनंद झाला असूनही त्याने तोंडातून ब्र काढला नाही. यावरूनच बनियन कंपूचा हा चतुष्पाद मेंबर किती हुशार होता ते तुमच्या लक्षात येईल. त्याच्या नाजुक पावलांचे वजन पायांखालच्या त्या भुईला मुळीच जाणवले नाही. पलीकडे पोचताच ते वस्ताद कुत्रे मांजराच्या पावलांनी पिशवीजवळ गेले आणि पिशवी तोंडात धरून लगोलग त्याने 'घूम जाव' केले. चिन्याचा हात या वेळी सुदैवाने स्वतःच्या तोंडाजवळ गेलेला होता. त्यामुळे चिंट्याला ते सहज जमले. पण त्याच्या मानाने पिशवी बरीच जड होती. त्यामुळे ती त्याला फरपटतच आणावी लागली. अर्थात् ती चाहूल त्या खादाडखाऊ

चिन्याला लागली. त्याने एकदम वळून पाहिले आणि तो ताडदिशी उभा राहिल '।चिंटूरूपी वैद्याने दिलेली मात्रा शंभर टक्के लागू पडली होती. चिनी भेंग्याचा आजार हा हा म्हणता पळाला होता.

कर्कश आवाजात त्याने एक शिवी हासडली—चिनी भाषेतली इरसाल शिवी. नशीब तुमचं आमचं की असले शब्द आपल्याला उच्चारता येत नाहीत किंवा त्यांचा अर्थही आपल्याला कळत नाही.

आता हा काय करतो म्हणून बन्या त्याच्याकडे एकटक नजरेने पाहू लागला. दरम्यान चिंट्याने पिशवी फरपटत खड्ड्यापर्यंत नेली आणि आता विक्रमी वीराच्या थाटात त्या वाळक्या पानांच्या गालिच्यावरून तो चालू लागला.

बन्याने पाहिले तो चिन्याच्या हाताशी दोन बंदुका पडलेल्या. त्यांतली एक बंदूक तो आता उचलतो आहे....

एक अर्धा क्षणच बन्याची भीतीने गाळण उडाली. हा दुष्ट माणूस चिंट्याला गोळी झाडून मारणार तर नाही? ज्याला माणसाच्या प्राणाची किंमत नाही तो कशाला कुत्र्याच्या जिवाची पर्वा करतो!

श्वास रोधून घेऊन बन्या त्याच्याकडे पहात होता. दुसऱ्याच क्षणी त्याने एक निःश्वास सोडला. कारण गोळी झाडण्याऐवजी चिंट्याला रट्टा हाणण्यासाठीच चिन्याने बंदूक उचलली होती आणि आता तो दात-ओठ खात अन् तोंडातून शिव्यांचा वर्षाव करीत चिंट्याच्या मागे लागला होता.

बन्याला तेच हवे होते.

दहा पावलांवर मांडा ठोकून बसलेली बन्याची मूर्ती त्या माणसाच्या आता प्रथमच दृष्टीला पडली आणि तो ओरडला, "और एक बच्चा!—

क्या यह जंगल है या बालोद्यान ?– ए उल्लू ! यह कुत्ता किसका है ?– तुम्हारा ? तो पकडो उसको, नहीं तो मार डालूँगा–"

उत्तरादाखल बन्याने तोंडातून जीभ हातभर लांब काढली आणि त्याला वेडावले.

आता मात्र चिन्याचा संताप पोटात मावेनासा झाला. तिथे जागा कुठे होती म्हणा ! ताडताड उड्या मारीत...

थांबा ! उड्या म्हणजे किती ? फक्त दोन !

दुसऱ्याच उडीला स्वारीचा पाय त्या वाळक्या पानांच्या मऊ मऊ गालिच्यात जो घुसला तो आपल्या मालकाला घेऊन सरळ पंधरा फूट खोल गेला.

जिथे हे साहेब अंतर्धान पावले होते त्या ठिकाणी खड्डयावरचा पालापाचोळा दूर झाला आणि तिथे एक भोकसांड दिसू लागले. नंतर खड्डयाच्या आतून एक आर्त किंकाळी ऐकू आली.

खाणे टाकून बेगुमान भुंकत सुटलेल्या चिंट्याला एका हाताने कवटाळीत बन्या उठून पुढे धावला. खड्डयावरच्या काटक्या बाजूला करून त्याने आत डोकावले. खड्डयाच्या तळाशी पाणी होते वाटते. चिखलाने माखलेला तो चिनी धडपडत उठला होता आणि खड्डयाच्या काठावर चढण्याचा प्रयत्न करीत होता. बन्याला कळेना– आता काय करावे ? गेंड्याच्या गिड्डया पायांना तो खड्डा चढणे अशक्य होते खरे, पण थोड्या प्रयत्नाअंती माणूस वर चढू शकला असता. काय करावं ? कोणता उपाय योजून शत्रूची हालचाल बंद पाडावी ?

वरून एखादा धोंडा घालावा का त्याच्या डोक्यात ?


नाही– बन्याच्या अंगावर काटा उभा राहिला. काही झाले तरी बन्या एक कोवळा पोर होता आणि जातीचा दुष्ट तर मुळीच नव्हता. अगदी वरपर्यंत येऊन शत्रूने त्याला गाठायचा प्रयत्न केला असता तर बन्याने त्याला

जरूर ठोकले असते. अशा वेळी बंदुकीचा दस्ता त्याने अनेक वेळा वापरला होता हे तुम्हाला माहीत आहे. पण तो खड्ड्याच्या तळाशी आहे आणि सुटके-साठी धडपडतो आहे अशा वेळी त्याला वरून मारणे बन्याच्याने झाले नसते.

बन्या गोंधळून जाऊन खाली पहातो आहे तोच खड्ड्यातल्या चिन्याची नजर एकदम त्याच्याकडे गेली. दातओठ खात त्याने खुनशी दृष्टीने बन्याकडे पाहिले आणि चिखलात पडलेली आपली बंदूक सपाट्याने उचलून त्याच्या-वर रोखली. त्याबरोबर बन्याने आपली मुंडी झटकन् मागे घेतली.

साहजिकच त्याची नजर त्या वृक्षाकडे गेली आणि तो चपापला. दुरून मोटारगाडीचा आवाज कानात शिरत होता म्हणून नव्हे; वृक्षावर त्याला जे दिसले त्यामुळे.

योगायोग असा की झाडावर झोपलेला हरबान त्याच वेळी लोळता लोळता झाडावरून खाली पडला. आणि कुठे? तर नेमका त्या खड्ड्याच्या काठाजवळ !



बन्याच्या छातीत चर्रर्र झाले. त्याला वाटले, कुठून त्याच्या दोऱ्या सोडण्याची बुद्धी आपल्याला झाली !

हरवान पडला तिथेही वाळकी पाने चिकार होती. त्यामुळे त्याला फार मार लागला नसावा. तरी पण त्या धक्क्याने जागा होण्यापूर्वी कण्हत कुंथत तो डाव्या कुशीवर वळला होता आणि आता लोळत लोळत त्याची 'वळकटी' थेट त्या खड्ड्यात पडणार होती.

बन्या खड्ड्याच्या काठावरून त्याच्याकडे तीरासारखा धावला. डोळ्याचे पाते लवते न लवते तो त्याचे दोन्ही बाहू धरून त्याने त्याला मागे ओढले.

"क्या हुवा?" आपले डोके चोळीत हरबानने त्याला विचारले.

"कुछ नहीं. तुम बच गये और क्या? लेकिन पहिले उसका क्या करना, बोलो?"

"किसका?"

"उस दुश्मनका? बिचारा खड्डेमे पडा है–"

"वह गेंडा ना? उसकी फिक्र मत करो! अब हमारा कैदी है वह!" त्यांच्यामागून शब्द आले.

बन्या चपापून उभा राहिला आणि मग हर्षभराने हसला. नखशिखान्त शेवाळी पोशाख केलेले दोन तगडे जवान हातांत बंदुका घेऊन उभे होते. दोघेही बनियन कंपूचे जिगरदोस्त. एक हवालदार बाळाराम आणि दुसरा जमादार फत्तेसिंग.

भारतीय फौजेतले हे दोघे सैनिक एका जीप गाडीतून आले होते. अंमळ दूर म्हतारीच्या झोपडीजवळ ती जीप उभी होती. विश्वनाथ गावाभोवती गस्त

घालणाऱ्या शिपायांपैकी होते ते आणि या मोक्याच्या ठिकाणी अगदी वेळेवर हजर राहण्याची बुद्धी त्यांना झाली होती.

जमादार फत्तेसिंगने फास्टर फेणे नि हरबान यांच्या खांद्यांवर हात ठेवले आणि दोघांनाही छातीजवळ ओढून तो पुटपुटला, "मेरे बहादूर!" तितक्यात त्याचे लक्ष झाडाला बांधलेल्या दोऱ्यांकडे गेले आणि तो वर चढला.

हवालदार बालाराम खड्ड्याच्या काठाजवळ गेला होता. तो आत डोकावून ओरडला, "तुम्हारी बंदूक बाहर फेक दो! तुम हमारे कैदी हो!"

आत सामसूम. काहीच उत्तर आले नाही.

बालारामने पुन्हा आव्हान दिले, "बंदूक बाहर फेक दो, नही तो गोली चलायेंगे!"

पन्नास सेकंदे गेली, उत्तर नाही.

"यह मस्करी नही. हमारी प्लटून यहाँ खडी है. अगर बंदूक नही फेकोगे तो जानसे मरना होगा—"

एक-दोन-तीन-दहा सेकंद गेली आणि खूप जोर करून भिरकावलेली एक बंदूक खड्ड्याच्या काठावर येऊन पडली. बालारामाने ती उचलली. इकडे फत्तेसिंगने दोऱ्या आणल्या होत्या. दोघेही सशस्त्र जवान खड्ड्याच्या काठा-जवळ गेले आणि आत डोकावून त्यांनी गर्जना केली, "आ जाव ऊपर—"

पण उत्तरादाखल चिन्याचा हात कंबरेकडे जात आहे असे पाहून फत्तेसिंगचा राग अनावर झाला. एक डरकाळी फोडून त्याने वाघासारखी खड्ड्यात उडी मारली आणि तो त्याच्या मानेवर बसला. डाव्या हाताने त्याचा

गळा दाबून उजव्या हाताने त्याच्या कंबर-पट्ट्यातला हातबाँब त्याने बाहेर काढला.

"रस्सी फेक दो–" तो ओरडला.

वरून बालारामने रस्सी फेकली. तिने चिन्याचे हातपाय फत्तेसिंगने पक्के बांधून टाकले. बालारामने दुसरी रस्सी फेकली. ती वर झाडाला पक्की बांधलेली होती तिचा आधार घेऊन चिखलाने बरबटलेला फत्तेसिंग व त्याचा कैदी वर आले आणि त्यांनी त्या कैद्याला धरून आमच्या बालबहाद्दरांसह जीपकडे चालवला.

जीपगाडीत दुसरा एक कैदी आधीपासूनच निजवलेला होता— म्हातारीच्या झोपडीतला तो 'च्येवणलाय'.

आजीबाईचा निरोप घेऊन जीपगाडीतून विश्वनाथकडे जाताना ती शेव-लाडवांची पिशवी आमच्या बालवीरांच्या उपयोगी पडली. कारण त्यांना भुका कडकडून लागल्या होत्या आणि 'मौचिंटू'ने सगळेच पदार्थ काही फस्त केलेले नव्हते.

"तू त्या चिनी भाईला पकडायला गेलास," शेवेचा बोकणा भरीत फास्टर फेणेने हरबानला विचारले, "आणि स्वतःच कैद झालास, हे कसं काय? आपण तर बुवा चाटच पडलो. तुला हातपाय बांधलेल्या स्थितीत पाहून!"

"त्याचं कारण–" हरबान किंचित् खजील मुद्रेने म्हणाला, "थोडा माझा गाढवपणा आणि थोडा तुझा."

"म्हणजे?"

"म्हणजे असं की– ती कॉफी फुकटंफाकट शत्रूला कशाला पाजा? आपणच गट्ट करावी अन् रिकामा गट्टू त्याच्यापुढे ठेवावा अशी एक बेश

आयडीआ मला सुचली आणि म्हणून मीच ती घशाखाली ओतली !"

"शाब्बास ! मी तुला डोळा मारला होता की !"

"हो रे बाबा ! पण नीट मारला नाहीस ! मी त्या मारक्या डोळ्याचा अर्थ निराळाच केला ! त्याच्याचवरून तर मला ही आयडीआ सुचली. मला वाटलं तू असं सुचवतो आहेस की या गेंड्याला नुसतं टुकटुक कर अन् खरी कॉफी तूच पी !"

"भले !"

"आणि म्हणून मी ती प्यालो अन् हळूच त्या झाडावर चढलो. कारण तिथे मला काही तरी दिसलं होतं— पॉलिश केलेलं लाकूड ! झाडाच्या फांद्यांना थोडंच कुणी पॉलिश करतात ? तेव्हा मी ओळखलं की हे बंदुकांचे दस्ते आहेत. लगेच चढलो वर अन् उचलल्या बंदुका. पण मग खाली उतरवेनाच मला. सारखी आपली डुलकीच येई. लवंडलो झालं तिथेच, आणि झोप लागली. डोळा लागता लागताना लक्षात आला तुझ्या डोळा मारण्याचा अर्थ ! कॉफीत अमली पदार्थ होता ! पण मग काय उपयोग ! केव्हाच पोचलो होतो मी पऱ्यांच्या राज्यात !"

"आणि तू पऱ्यांच्या राज्यात शिरलास तशी या यमाने येऊन तुझे हातपाय बांधले, असंच की नाही ? —कळलं ! पण— पण— जमादारसाब, आपको कैसे पता चला हमारा ?"

"सब बताते हैं !" फत्तेसिंग म्हणाला. "तुम थानेपर तो चलो ! मेजरसाब तुम्हारी खोपडी उलटीपालटी न करेंगे तो मेरा नाम दुसरा !"

हे ऐकून दोघांनी एकमेकांकडे भयभीत नजरेने पाहिले. दोघांच्याही पोटात एकदमच गोळा उठला होता.

फत्तेसिंग व बालाराम यांच्याकडून मग त्यांना जी हकीगत कळली ती अशी—

पर्तापगढच्या वाटेवर गेंड्याच्या भयाने खड्ड्यात उडी घेणारा तो पळपुटा चिनी सैनिक आमच्या बनियन कंपूने कसा गिरफदार केला ते आपण मागच्या एका गोष्टीत वाचलेच आहे. कंपूतली मुले ती खूषखबर छावणीवर द्यायला निघाली तेव्हा वाटेतच त्यांना टेहेळ्या पथकातले पाच सहा जवान भेटले. त्यामुळे त्यांचे काम फारच सोपे झाले. त्या चिनी कैद्याला तावडतोब हलवून गावाकडे त्याची मिरवणूक काढण्यात आली.

बनियन कंपूकडे त्या मंडळींना असे कळले की, फास्टर फेणे नि हरवान भुरक्या चिन्याच्या शोधार्थ रानात हिंडताहेत. तत्क्षणी जीपमध्ये बसून जमादार फत्तेसिंग नि हवालदार बालाराम यांनी जंगल पालथे घालायला सुरुवात केली. वाटेत त्यांना म्हातारीचे घर लागले. तिथे प्रति-च्येवणलाय हातपाय बांधून त्यांची वाटच पहात होता. त्याला प्रेमालिंगन देऊन त्यांनी जीपमध्ये घातले आणि मग म्हातारीने दाखवलेल्या वृक्षाकडे ते आले. पुढची सगळी हकीगत आपल्याला माहीत आहेच.

ही मंडळी विश्वनाथ गावी पोचताच मेजरसाहेब स्वतः त्यांना सामोरे आले. एकटे दुकटे दूर कुठे जायचे नाही असे बजावले असताना भलत्या फंदात पडणाऱ्या या शैतान लडक्यांचा त्यांना असा राग आला की बोलायची सोय नाही. गिरफदार करून या पोरांना ठाण्यावर आणताक्षणीच

त्यांच्या श्रीमुखात देण्यासाठी त्यांचे हात शिवशिवत होते. पण जीप जवळ येताच जमादार फत्तेसिंगने जेव्हा उडी मारून सॅल्यूट ठोकला आणि या जोडगोळीचा पराक्रम पुराव्यासकट साहेबांना सादर केला; तेव्हा काय बोलावे तेच त्यांना समजेना. त्यांचे हात अजूनही शिवशिवत होते, पण ते केवळ मारण्यासाठी नाही. संताप, कौतुक, प्रेम, अभिमान अशा अनेक भावनांनी त्यांच्या धिप्पाड देहाची दारुण अवस्था केली होती. छाती धाडधाड उडते आहे, हातांच्या मुठी वळलेल्या आहेत, डोळे बेडकांसारखे फुगून बाहेर आले आहेत, ओठ थरथरत आहेत आणि गळ्याचे गळगुंड गुड्ड गुड्ड हलते आहे, अशा अवस्थेत तो धीरगंभीर पुरुष पुढे आला आणि तोंडातून नुसते "व-व्व-व्व–" असे काही तरी आवाज काढीत त्याने साश्रुनयनांनी त्या दोन पोरांना घट्ट मिठी मारली.

फास्टर फेणे सांगतो की, "आमच्या दोघांच्याही बरगड्या रात्रभर दुखत होत्या."

# अपूर्व काटाकाटी

पतंगाचा सीझन सुरू झाला होता आणि ती साथ नेफा प्रदेशातही पोचली होती. हिमालयाच्या त्या पायथ्याच्या भागात कडक लष्करी शिस्त जारी होती. पण म्हणून मुलांना पतंग उडवायला कोणी मनाई केलेली नव्हती. बिश्वनाथ गावातही अधूनमधून पतंग फडफडत होते.

नेफा आघाडीवर अलीकडे सामसूम होती. पण ही सामसूम म्हणजे एक प्रकारची स्मशान-शांतता आहे असेच आपले सेनानी मानीत होते. वालाँगच्या लढाईनंतर शत्रूने एक अजब पवित्रा टाकला होता. एकाएकी आपली मुसंडी थांबवून त्यांनी तहाची बोलणी सुरू केली. आणि अपमानदग्ध भारताने ती फेटाळून लावताच त्यांनी उदारपणाचा आव आणून एकतर्फी माघार

ाली होती. उध्वस्त खेडी तशीच टाकून चिनी लष्कर आपण होऊन मागे टत होते. करून सवरून नामानिराळे !

पण भारत आता सावध बनला होता. तेजपूरहून आघाडीकडे लष्करी सामानाची सतत रीघ सुरू होती. संरक्षक फळी मजबूत करण्यात आली. सीमेकडे नव्या दमाच्या पलटणींमागून पलटणी गुपचूप येऊन दाखल होत होत्या. पंधराच दिवसांपूर्वी सुनसान झालेल्या एकाच ठाण्यावर आता एकंदर दहा हजार खडी फौज रोज कवायत घेत होती; हे कोणाला खरेही वाटले नसते. चिन्यांना तर तसा संशयही आलेला नव्हता. त्यांची कल्पना अशीच होती की, भारतीय फौजांची दाणादाण होऊन त्या दिल्ली– कलकत्याकडे पळाल्या असाव्यात. 'त्यांचा तो समज तूर्त तसाच राहू द्या; पण लवकरच अशी वेळ आणा, की पुन्हा असा गैरसमज त्यांनी यावज्जीव करून घेऊ नये' असा स्फूर्तिदायक संदेश भारतीय सेनापती आपल्या जवानांना देत होते.

बन्या ऊर्फ फास्टर फेणे आघाडीवर सर्वांना माहीत झाला होता. त्याच्या 'बनियन कंपू' ची मुले रोज आसपासच्या जंगलात सहलीला जात. सारे रान त्यांनी विंचरून काढले होते आणि विश्वनाथ गावाच्या परिसरात एकही दुस्मन राहिलेला नाही अशी त्याची खात्री झाली होती. खुद्द गावातच कोणी घरभेद्या असेल तर अर्थात् गोष्ट निराळी.

बनियन कंपूचे सदस्य पतंग करण्यात गर्क झाले होते. प्रत्येकाने आपापला छोटा पतंग तर केला होताच; पण कंपूचा म्हणून एक मोठा सामुदायिक पतंगही तयार होत होता. मिरीने जांभळ्या रंगाची सुंदर किनार कातरली होती. ती तिने आता पतंगाच्या काठाकाठाने चिकटवून दिली. चंब्याने हातात बंदूक घेतलेल्या जवानाचे चित्र काढले होते, ते तिने कापून पतंगाच्या

मध्यभागी डकवले; आणि खाली शिक्का मारला : ' बनियन कंपू ' आता ५
लांबच लांब शेपूट जोडून दिल्यावर पतंग तयार झाला.

पण ही सगळी कलाकृती पूर्ण झाली आणि लगेच चिमुकल्या वीराबेबीने जेव्हा त्यातल्या एका पतंगावर दौत उपडी केली, तेव्हा हरबानचा राग त्याच्या पोटात मावेना.

"शैतान कहीकी !" असे म्हणून त्याने वीराबेबीच्या एक मुस्कटात भडकावून दिली. लगेच तिने भोकांड पसरले.

"हे रे काय हरबान–तिला काय समजतंय् ? लहान पोर ती !" असे म्हणून मिरीने हातातले काम टाकून बेबीला उचलले. फास्टर फेणे पण हरबानवर रागावला.

"तेरा दिमाग बिगडा है क्या ?" तो ओरडला. "बच्चेको मारता है ?"

"लाल चीनी कहींका !" चंपाने ठेवणीतला आहेर दिला.

आतापर्यंत शरमिंदा झालेला हरबान एकदम चवताळून म्हणाला, "ए फास्टर फेणे, इसको समझाना ! मला वाटेल ती शिवी दिली तरी चालेल, लेकिन लाल चीनी कहना नही !"

"अच्छा ! तो दालचिनी चलेगी ?" एका कल्पक डोक्याच्या मुलीने त्याला सवाल केला आणि त्यामुळे त्या मसालेदार प्रकरणात खसखशीची भर पडली. हशाच्या कल्लोळात बेबीचे रडणेही कुठल्या कुठे लोपून गेले.

हशाच्या लाटा ओसरल्यावर बन्या म्हणाला, "चला आता आपापले पतंग घेऊन—"

" लेकिन यहाँ गर्दी बहोत है– बाहर जाएंगे– "

" हो– हो ! आपण पार गावाच्या वाहेर जाऊ."

" डफळावर जाऊ या का ? तिथून उंच उडवता येईल पतंग ! " मिरी.

" वेड लागलंय् की काय तुला ? डफळाचा डोंगर जवळ नाही इथून ! " हरवान म्हणाला. " आपण उत्तरेकडे जे सपाट मैदान आहे ना, तिकडे जाऊ. तिथनंच झकास उडवता येईल."

" काटाकाटी खेळायची, बरं का ? हरबानचा पतंग मी काटीन !– बीट लागली ! " चंव्या ओरडला.

" एवढंसं पिल्लू पण वखवख किती करतंय् ? " फास्टर फेणे म्हणाला. आणि त्याला एकदम आठवण झाली चिंट्या कुत्र्याची. " चिंट्या कुठे तरी गेलेला दिसतो. बरं झालं ! नाही तर ती ब्याद सारखी पायात लुडबुडायला आली असती ! "

लवकरच ही फौज शेतातली माती तुडवीत माळरानाकडे निघाली. त्यांच्या डाव्या हाताला डफळा डोंगराचे उंचवटे दिसत होते, तर समोर हिमालयाच्या पायथ्याची डोंगरांची रांग पसरली होती. पहाडांच्या मागून दूर अंतरावर नामचा बरबा हे पंचवीस हजार फूट उंचीचे शिखर आपले पांढरे शुभ्र टक्कल दाखवीत होते. पहाडांच्या याच रांगेत पश्चिमेला थागळा नि तुलांग; मध्यभागी लोंगजू, लुशा नि डोम आणि पूर्वेला नामू नावाच्या खिंडी आहेत. त्याच खिंडींतून चिनी सैनिक भारतावर चालून आले होते. लोहित प्रांतात तुंबळ युद्ध होऊन वालाँग गावाचा त्यांनी कब्जा घेतला होता.

वालाँगच्या दिशेला पहात बन्या म्हणाला, "शत्रूचा पुढला हल्ला येईल तो तिकडनं!"

"तिथे म्हणे रस्ते बांधताहेत ते लोक!"

"अरे, पण त्यांना लढायचं नाही ना आता? परत गेले ना चंबूगवाळं घेऊन?"

"त्या थापा रे! जगाच्या डोळ्यांत धूळ फेकणं आहे ते!" बन्या म्हणाला, "जगात जिकडे तिकडे नाचक्की झाली ना, म्हणून ही सारवा-सारवी चालली आहे म्हणे!"

"रशियाने पण तोंडात शेण घातलं की!"

"काही शेण घातलं नाही!" हरबान पोक्तपणाचा आव आणून म्हणाला, "रशिया नुसता गप्प बसलाय्. काही बोलत नाही."

"किती झालं तरी चीनचा जुना मित्र आहे तो!"

"इस दुनियामें—" मिरी गाऊ लागली, "नही किसीका— कोई भी भाई—"

"भाईवरून आठवण झाली—" हरबान म्हणाला, "फास्टर फेणे, तुझ्या त्या बहिणीचं काही पत्र आलं का रे तेजपूरहून?"

"बहिणीचं?" बन्या चमकला. मग त्याला एकदम आठवण झाली. जी-सेव्हनच्या लढाईत त्याच्या पायाला जखम झाल्यानंतर काही दिवस त्याला सक्तीने इस्पितळात ठेवले होते. तिथे सुधाताई नेने नावाच्या नर्सने त्याची खूप शुश्रूषा केली. बन्याला तिचा इतका लळा लागला की, त्याने तिला बहीण मानून चक्क ओवाळणीसुद्धा घातली होती.

सिस्टर नेनेच्या आठवणीने बन्या किंचित् विषण्ण बनला. तिची तेजपूरच्या मोठ्या इस्पितळात बदली झाल्याला आता बरेच दिवस झाले होते. आणि अजून तिचे पत्र आले नाही म्हणून मधून मधून त्याला खुपल्यासारखे होत असे. पण तो स्वतःची समजूत घालायचा, की किती झाले तरी हा मिलिटरीचा मुलूख आहे. सेन्सॉरमधून बाहेर पडायला उशीर लागायचाच पत्राला !

मैदानात पोचताच प्रत्येकाने आपापली फिरकी हातात धरली आणि मांज्या ढिला करून पतंग उडवायला आरंभ केला.

मोठ्या पतंगाची फिरकी हरबानच्या हातात होती आणि मांज्या फास्टर फेणेने आपल्या दोन्ही हातांच्या चिमटीत सफाईने धरला होता. "आणखी ढिला सोड की लेका !" बन्या ओरडला.

वारा अनुकूल होता, त्यामुळे पतंग हां हां म्हणता आकाशात उंच गेला. बन्याची एकटक नजर त्या पतंगाकडे होती. मिरी आपला छोटा पतंग उडवण्याचा प्रयत्न करीत होती. आणि वीराबेबी फिरकी घेऊन तिच्यामागे धावत होती. या धावपळीचे कारण दोघांनाही पतंग उडवणे जमत नव्हते. तो जेमतेम दहा-बारा फूट उंच उडायचा अन् एकदम घायाळ पाखरासारखा खाली येऊन आपटायचा. कुठल्या तरी झुडपात अडकायचा. आणि मग तो सोडवताना नाकी नऊ यायचे. असे किती तरी वेळा झाले. आणि पतंगामागे फरपटत दोघीही बऱ्याच दूर गेल्या. शेवटी मिरी चिडली अन् हातातला मांज्या सोडून देऊन म्हणाली, "जाने दो ! यह अपना काम नही."

बेबीने तिच्याकडे रोखून पाहिले. मग मिरीच्या चिडकेपणाला नाक मुरडून तिने तो अस्ताव्यस्त पडलेला मांज्या संथपणे नीट गुंडाळायला सुरुवात केली. वीरा लहानशी असली तरी तिची चिकाटी फार दांडगी होती.

इकडे मिरी वर पहात होती. बनियन कंपूचा मोठा पतंग मजेने आकाशात उडत असलेला तिला दिसला. फडफडणे नाही, ओढ घेणे नाही, काही नाही. खूप दूर गेलेले विमान जसे उडत असूनही स्थिर वाटते, तसा तो पतंग स्थिर वाटत होता. पण मिरीला माहीत होते की, तो उडतो आहे— संथपणे पुढे पुढे चाललेला आहे. दुसरेही अनेक पतंग आकाशात दिसत असले तरी बनियन कंपूचा पतंग सर्वांत दूर गेलेला होता. त्याची बरोबरी दुसऱ्या कोणीही केली नव्हती.

पण नाही कशी? थांबा. ते काय दिसतं आहे? पतंगच का? की घार?

"बेत्री! ते बघ काय ते— कित्ती कित्ती उंच उडतंय्! आपल्या पतंगाच्या पार पलीकडे गेलंय्!"

"आणि तरी आपला पतंग त्याला गाठणार!—" बेत्री पण तिकडे पहात म्हणाली, "आणि– अय्या! विमान!"

एक हेलिकॉप्टर तेवढ्यात पतंगाला आडवे आले होते.

"नुसता गाठणार नाही— काटणार!" मिरी उद्गारली. कारण खरोखरीच बनियन कंपूचा पतंग त्या दुसऱ्या खूप लांब गेलेल्या पतंगाला आडवा जात होता. पण दोन्ही पतंग आता इतके दूर गेलेले होते की, त्यांचे धागे आता अजिबात दिसत नव्हते. त्यामुळे ते एकमेकांना फुली करीत आहेत की एकमेकांपासून दूर जात आहेत हे कळणे कठीण होते.

मिरीने आपली नजर खाली आणली आणि डोळे बारीक करून पाहिले, तेव्हा दीड एक फर्लांग अंतरावर तिला 'बनियन'च्या पतंगाचा मांज्या दिसला. ती आपल्याशी म्हणाली, "असाच त्या दुसऱ्याचा मांज्या दिसतो का पाहू या."

त्याप्रमाणे तिने जेव्हा दृष्टी खाली आणली तेव्हा उजव्या हाताला एक लहान टेकाड होते त्याच्या पलीकडे झाडीबाहेर निघालेली एक सूक्ष्म पांढरी रेषा तिला दिसली. कोळ्याच्या जाळ्याचा बारीक तंतू दिसावा तशी.


"चल ग बेबी, आपण पाहू या कोण उडवतंय—"

बेबीने एव्हाना आपल्या फिरकीला सबंध मांज्या गुंडाळला होता. पतंग मात्र फाटला होता. तो तसाच टाकून ती फिरकी घेऊन मिरीबरोबर निघाली. मिरीने तिला जवळजवळ फरपटतच टेकाडावर नेले.

पलीकडे टेकडीच्या पायथ्याशी एक लहानशी बखळ होती. आणि बखळीत उभा राहून एक माणूस पतंग उडवीत होता. एकटाच होता तो. ठेंगणा, काटकोळा. अंगातले कपडे मळलेले. विजार गुडघ्यापर्यंत गुंडाळून घेतलेली. डोक्यावर उन्हाची फताडी हॅट. त्याचे संपूर्ण लक्ष पतंगाकडे लागलेले होते. तरी आपल्या डाव्या बाजूला पाने सळसळल्याचा आवाज त्याने ऐकला. अर्धा क्षण त्याने यांच्याकडे वळून पाहिले आणि पुन्हा आकाशाकडे नजर लावली.

"यह कौन है बदमाष— हमारा पतंग काटनेवाला?" तो दात-ओठ चावीत ओरडला. "तुम्हारा है कोई?"

"जी! हमारा है!" मिरी त्याच्याकडे पहात अभिमानाने म्हणाली, "इतना घुस्सा क्यौं करते हो? एक छोटा लडका तुमको हराता है इस लिए?"



" यह डाकूगिरी है ! उसको बोलना– हमको मत सताव ! – जाव– जाव जल्दी ! "

मिरीला त्याचा तो अवतार पाहून नवल वाटले. ती म्हणाली, " यह अज्जीब है ! हम तो काटाकाटीका खेल हमेशा खेलते हैं ! "

" जाव बोला ना ?— जाव पहिले— जाव ! "

त्याने पुन्हा मिरीकडे रोखून पाहिले. या वेळी त्याचा चेहरा उग्र अन् डोळे लालबुंद दिसत होते. नुसते बोलूनच तो थांबला नाही, तर त्याचा हात कंबरेकडे गेला. तिथे त्याच्या पट्ट्यात भंडारी लोक वापरतात तसा एक कोयता अडकवलेला होता.

वीराबेबीने ते पाहिले. ती मिरीच्या मागे लपून म्हणाली, " चल, मिरा-बेन— आपण पळून जाऊ ! "

मिरीने आश्चर्याने त्या माणसाकडे पाहिले. पण ती थांबली नाही. वीराबेबीचा हात धरून ती माघारी फिरली. आणि पुन्हा टेकाड चढून मैदानात गेली.

तिकडे फास्टर फेणे अगदी खुषीत आलेला होता. इतक्या उंचीपर्यंत आपण पतंग उडवू शकू अशी त्याची त्यालाच कल्पना नव्हती. पण तो उडवला, इतकेच नाही तर आपल्या प्रतिस्पर्ध्यावर मात केली आणि आता त्याचा पतंग काटण्याच्या आपण बेतात आहोत ही घटना खरोखर त्याला गुदगुल्या करणारीच होती.

" हरबान ! कोण असेल रे तो दुसरा पतंगवाला ? " त्याने दोराला किंचित् ओढ देत विचारले.

हरबान फिरकी धरून वर पहात स्थिर उभा होता. तो म्हणाला, " मैं कैसे कहूँ ? असेल कुणी तरी तुझ्याच सारखा वाह्यात छोकरा ! "

" ते तर झालंच ! पण उंच असेल की ठेंगणा ? वारीक असेल की लठ्ठ ? आणि– आणि शत्रू असेल की मित्र ?— उगीचच आपले विचार मनात येतात. एकदा वाटतं, कदाचित् शत्रूही असेल. कारण आपलाच पतंग चांगला वालँगपर्यंत गेलेला आहे."

" तो माणूस कसलाही असू दे रे ! आपण त्याचा पतंग काटला की, त्याची सूरत फोटो काढण्यासारखी होईल !"

" होय. पण फोटो काढणारा कुणी हवा ना जवळ ?—आणि ए ! ते हेलिकॉप्टर कशाला लुडबुडतंय मधे मधे ? ते पण शत्रूचं असेल ?"

" देव जाणे !"

इतके त्यांचे बोलणे होत आहे तोच समोरून धावत येत असलेली मिरी त्यांना दिसली. मिरीच्या मागोमागच वीराबेबी पण फरफटत येत होती. दोघींच्याही तोंडावरून घाम निथळत होता.

" ए फास्टर फेणे ! वैसे मत करना !" मिरी ओरडली.

" क्या मत करना ?" बन्याने आश्चर्याने विचारले. एक अर्धा क्षणच त्याने मिरीकडे पाहिले होते; पुन्हा पतंगाकडे नजर लावली होती.

" वह पतंग मत काटना."

" क्यौं ?"

" अरे, त्या पतंगाचा मालक वहुत खराब आदमी है, उसका दिमाग भडका है !"

" तुम्ही पाहिलंत त्याला ? म्हणजे शत्रू नाही. आपल्याच हद्दीतला आहे कुणी तरी !"

" आणि दिमाग बिघडलाय् म्हणता तर भडकू दे !" हरबान म्हणाला, " आम्ही काटणार पतंग ! त्याला काय लागतं भडकायला !"

" आहे तरी कोण तो ?" फास्टर फेणेने कुतूहलाने विचारले. " छोटा– बडा– "

" बडा आदमी है !"

" अच्छा, तो छोटेका खेल क्यों खेलता है ?" हरबान म्हणाला. " पतंगात काटाकाटी नेहमीच चालते हे त्याला माहीत पाहिजे."

" त्याने आम्हाला कोयता दाखवला. म्हणाला, पतंग काटलात तर तुम्हाला काटू ! डाकू लोक कुठचे !"

" काय ?"

" तो म्हणाला असं !"

" अबे जाव ! तेरी ऐसीकी तैसी !" हरबान म्हणाला.

" त्याला एवढं भडकायला झालं काय पण ?" फास्टर फेणे म्हणाला.

" काटाकाटीत तर खरी मजा असते. ही लढाई आहे, डाकूगिरी नाही !"

" हां ! यात पण डाकूगिरी करणारे असतात काही लोक." फास्टर फेणे म्हणाला. " आमच्या पुण्या–मुंबईकडे लांब लांब काठ्या हातात घेऊन हिंडणारे काही मारेकरी असतात. काठीच्या टोकाला एखादी आकडी लावून चोरासारखे हिंडत असतात ते. आणि एखाद्याने पतंग उडवला रे उडवला की धावत जाऊन आकडीने त्याचा मांज्या तोडतात !"

" ती खरी डाकूगिरी ! लेकिन काटाकाटी तो चालाकीका काम है– "

हरवान हे वाक्य बोलतो आहे तोच एक घार मध्ये आली. – पण छे ! घार नसणार ती. एवढ्या दुरून घार कशी दिसेल? शत्रूकडचं हेलिकॉप्टर तर नाही? ते कशाला मधेमधे लुडबुडतं आहे?

बन्याने खरोखरच मोठ्या चलाखीने आपल्या दोराला अशी एक 'लेगब्रेक' ची ओढ दिली होती की क्षणार्धात त्या दुसऱ्या पतंगाचे ' कायपो छे ' झाले. (या तांत्रिक भाषेचा अर्थ मुंबईच्या मुलांना तरी सांगायला नकोच !) पतंग काटला गेला. लगेच बन्याने आपला दोर खेचला. हरवानला खूण करताच त्याने फिरकी गुंडाळायला सुरुवात केली.

त्या काटलेल्या पतंगाला घेऊन बनियन पतंग तीव्र वेगाने खाली येऊ लागला. खूपखूप खाली आल्यावर दुर्दैवाने एक उंच झाड आडवे आले आणि त्याच्या पर्णराजीत दोन्ही पतंग अडकले.

" चलो !" बन्या हरवानचा हात धरून घाईघाईने म्हणाला, "जाएंगे– अपनी लूट ले लेंगे ! इथून फार दूर नाही."

दोघेही उड्या मारीत निघाले. त्यांच्या पाठोपाठ चंब्याही निघाला. त्याचा पतंग फाटल्यामुळे त्याला आता काम उरले नव्हतेच.

बाकीच्या मुलांना गोळा करून मिरी ओरडली, " आम्ही जातो रे गावात परत ! "

पण बन्या-हरवान-चंब्या यांना ते ऐकू तरी गेले की नाही, कुणास ठाऊक ! हरणासारख्या उड्या मारीत ते एव्हाना शंभर पावले दूर गेले होते.

वाटेत येणारी झुडपे तुडवीत, खडकांवरून उड्या मारीत अन् उंचवटे पार करीत ते शेवटी त्या झाडाजवळ येऊन पोचले.

झाड कदंबाचे होते. त्याचा घेर चांगला विस्तीर्ण होता. पण पाने सुकत आली होती. झाडाच्या अगदी वरच्या फांदीवर वनियन कंपूचा पतंग अडकला होता, आणि त्या दुसऱ्या पतंगाचा मांज्या मात्र खालच्या फांदीला लटकत असून खुद्द पतंग अर्धवट फाटलेल्या अवस्थेत हवेत फडफडत होता. त्याला मधोमध एक भोसकांड पाडले होते; पण बाकी पतंग शाबूत होता.

हरबान झाडावर चढणार तोच दुसरीकडून एक माणूस धावत आला आणि त्याने गर्जना केली, "नीचे उतरो !"

इतके तो बोलतो आहे तोच शेजारच्या झाडीतून भुंकण्याचा आवाज आला अन् लगोलग चिंट्याची स्वारी बाहेर आली. त्या चिमुरड्याच्या अचानक हल्ल्यामुळे पतंगवाला इतका दचकला की खाली पाहण्याचे भान न राहून त्याच्या पायाला ठेच लागली. 'आ ऽ यू' करून तो एकदम उभा राहिला अन् कळवळून त्याने एक पाय उचलून आपल्या हातात धरला. चंब्याच्या हातात फिरकी होती. तिचा मांज्या चांगला कासराभर खाली लोंबत होता. चंब्या त्या माणसापुढे गेला आणि त्याने त्याला चार-पाच प्रदक्षिणा घातल्या. मांज्याचे लपेटे त्याच्या पायांभोवती बसले. चंब्याने फिरकी ओढली तशी ताण बसून ते लपेटे आवळले गेले. पायांतून रक्त ठिबकू लागले.

चंब्या म्हणाला, "तेरी ऐसी की तैसी !"

चिंट्या आपला फास्टर फेणेपाशी जाऊन शेपूट हलवणे नि जोरजोराने भुंकणे अशा दोन्ही क्रिया एकदम करीत होता.

त्या माणसाने चिडून आपला कोयता चिंट्यावर फेकून मारला. बरे झाले, चिंट्या तेवढ्यात बाजूला झाला म्हणून. कोयता मागे जाऊन मातीत पडला.

इकडे बन्या उड्या मारीत झाडाजवळ गेला. खोड चांगले मजबूत नि जाड होते. पण त्याला टेंगळे भरपूर होती, त्यामुळे बन्याला तेव्हाच वर चढता आले. त्याने मांज्या सोडला अन् तो लुटीचा पतंग मोकळा केला. लगेच खाली उभ्या असलेल्या हरबानने तो पकडला. पिवळ्या रंगाचा नि तांबड्या लाल बॉर्डरीचा पतंग होता तो ! बन्याने खाली उडी टाकताच हरबान चंब्याचा हात धरून म्हणाला, "चलो— पळा इथून !"

फास्टर फेणेने चिंट्याला उचलून कडेवर घेतले आणि तिघांनी तिथून धूम ठोकली. पळता पळता फास्टर फेणे मागे वळून पहात म्हणाले, "चंब्या, तू हे बरं केलं नाहीस ! मांज्यात काचेची पूड असते, माहीत आहे ?"

चंब्या मोठाले डोळे करून म्हणाला, "खरंच ? मग त्याला काही होईल आता ?"

"जखम होईल. कधी कधी याचा परिणाम वाईट होतो. मागे आमच्या महाराष्ट्रात एका माणसाच्या गळ्यात मांज्या अडकून त्याचा गळा कापला होता म्हणे !"

"शिरच्छेद ?"

"म्हणजे डोकं नाही तुटलं रे ! पण जखम फार झाली. आणि त्यामुळे विषबाधा होऊन तो मेला !"

चंब्याला आता खरोखरीच वाईट वाटलेले दिसले. तो धावता धावता थांबला अन् मागे वळून पाहू लागला. त्याचे मित्रही थांबून पाहू लागले.

"इतकी नको काळजी!" फास्टर फेणे म्हणाला. "तो बघ दवाखान्याच्या दिशेने चाललाय्. डॉक्टर पाहून घेतील."

हरवान म्हणाला, "होय. पण नंतर तो कमांडरसाहेबांकडे तक्रार करील तेव्हा?"

"मग कमांडरसाहेब आपलं पाहून घेतील." बन्याने जरा काळजीच्या स्वरात उत्तर दिले.


आपल्या अड्ड्यावर पोचताच तिघेही खाली बसले. त्यांच्या एका मित्राने त्यांच्यासाठी चणेकुरमुरे आणले होते; त्यांच्या त्यांनी फक्या मारल्या. वर पाणी ढोसले आणि मग सर्वजण मिळून तो लुटलेला पतंग पाहू लागले.

"मधे फाटला आहे तिथे कागद डकवून आपण जपून ठेवू ही लूट!" फास्टर फेणे म्हणाला.

"वा! याचा पण पतंग आपल्यासारखाच छान आहे की!" तो चणेवाला मित्र म्हणाला. "आपल्यासारखीच नक्षी पण आहे त्याच्यावर!"

होती खरी त्या पतंगाच्या तांबड्यालाल काठामधून नक्षी काढलेली. काळ्या कुळकुळीत शाईच्या ठळक रेघा होत्या त्या.

बालमित्रांनो, तुम्हांला पण दाखवू का ती नक्षी कशी होती ते? हा पहा नमुना—



"साधीच नक्षी आहे— माझ्या नक्षीइतकी काही छान नाही!" मिरी तेवढ्यात त्यांना येऊन मिळाली होती, तिची ही टीका.

"अग, तू बोलून चालून आर्टिस्ट! तुझी सर त्या रेम्याडोक्याला कशी येणार?" फास्टर फेणे.

"शिवाय ही नक्षी काही त्याने स्वतः काढलेली नसेल!" चंब्या म्हणाला, "छापील असेल."

"नाही. छापील नाही." हरबान न्याहाळून पहात म्हणाला, "ही हाताचीच शाई आहे."

"आणि सबंध नक्षी काही सारखी नाही, बन्या." मिरी बारकाईने निरखून पाहून म्हणाली. "हे पाहिलंस मधेच निराळं डिझाइन?"

होते खरे चार-पाच ठिकाणी वेगळे डिझाइन काढलेले. म्हणजे नक्षीच्याच ओळीत, पण निराळी आकृती. चटकन् कोणाच्या लक्षात सुद्धा आले नसते.

नक्षीत ती आकृती कशी गोवलेली होती ते तुम्हाला कळावे म्हणून बालमित्रांनो, त्याचा एक नमुना इथे देतो.



मघाच्याच नक्षीचा हा आणखी एक तुकडा आहे. पण त्यातल्या दुसऱ्या पूर्ण घरात मध्यभागी बाकीच्या घरांपेक्षा किंचित् निराळेच काही तरी दिसते.

“ चिनी किंवा जपानी अक्षरं वाटतात. ” फास्टर फेणे म्हणाला.

“ मी सांगतो, हे काय असेल— ” हरबान म्हणाला. “ आपल्या विकतच्या पतंगावर कसं असतं —Made in India— हिंदुस्तानमे बना हुआ माल ! तसं असेल काही तरी— हा पतंग जपानमध्ये बनवलेला असेल. ”

“ किंवा हाँगकाँगमध्ये. ”

“ आपल्या पंडितजींना विचारू या का ? ”

खरे म्हणजे तो पतंग जपानमध्ये बनवलेला असो, नाही तर हाँगकाँगमध्ये, त्याच्याशी या मुलांना काय कर्तव्य होते ? पण कधी कधी— बालमित्रांनो— तुम्ही पोरे उगीचच एखाद्या गोष्टीच्या मागे लागता ! झुरळासारखी चिकाटी असते बुवा तुमची !

काही असो, तो टोलेजंगी पतंग घेऊन बनियन कंपूतली ती पोरे छावणीकडे निघाली खरी. फास्टर फेणेही जरा रेंगाळत पण त्यांच्या मागून निघाला. त्याच्या कपाळावर एक सूक्ष्म आठी दिसत होती. मध्येच त्याने थबकल्यासारखे केले; खालचा ओठ दाबला अन् मग एक चुटकी वाजवून त्याने आपल्या मित्रांच्या मागे धूम ठोकली.

पंडितजी हे छावणीतले दुभाषे होते. 'पंडितजी' या पदवीवरून ते कुणी गंधटिळा लावलेले, पटका बांधलेले, उपरणेवाले गृहस्थ असतील असे मानण्याचे कारण नाही. तेही मिलिटरीच्या खाकी पोशाखात असत. पण अनेक भाषांचे त्यांना जे ज्ञान होते, त्यामुळे त्यांना पंडितजी म्हणत. चिनी, जपानी, ब्रह्मी या परदेशी भाषा त्यांना बऱ्यापैकी येत असत. आघाडीवरच्या प्रत्येक फौजेबरोबर असा दुभाष्या लागतोच.

बनियन कंपूने दिलेला पतंग पंडितजींनी जमिनीवर पसरला, डोळ्यांवर आरशी चढवली आणि ती नक्षी नीट निरखून पाहिली. पाचदहा क्षणांतच त्यांचे डोळे चमचमू लागलेले दिसले. त्यांना काही तरी विलक्षण वाटले असावे, पण खात्री नसावी ! म्हणून त्यांनी कोपऱ्यातल्या शेल्फवरचा एक ग्रंथ आणला अन् उघडून पाहिला. बन्याने डोकावून पाहिले. तेव्हा त्या ग्रंथातली चिनी अक्षरे त्याला दिसली. तो कोश असावा बहुतेक.

अर्धं एक मिनिट पंडितजी स्तब्ध बसले होते. मग ते गंभीरपणे म्हणाले, "यह बहुत सीरियस मामला है !"

"चिनी अक्षरं आहेत ती ?" फास्टर फेणेने विचारले.

"मेड इन्—" हरबान म्हणाला.

"मेड इन् बिडिन् कुछ नही ! अगर मेड इन् हो तो मेड इन् पेकिंग !"

यावर वऱ्याने ' ट्रॉक् ' केले.

" काय म्हणता पंडितजी ? " हरबान उद्गारला.

" शंकाच नको त्यात ! ही अक्षरं भयंकर महत्त्वाची आहेत. त्यांत अर्थ भरलेला आहे— " असे म्हणून नक्षीतल्या त्या वेगळ्या दिसलेल्या प्रत्येक आकृतीवर – म्हणजेच शब्दावर – बोट ठेवून पंडितजींनी मुलांना त्याचा अर्थ सांगितला.

बालमित्रांनो ! आपल्याला जे एकच अक्षर वाटते तो चिनी लिपीत बहुधा एक शब्द असतो. किंवा कधी कधी तर दोन-तीन शब्द. बनियन कंपूला मिळालेल्या त्या पतंगावर नक्षीत गुंतलेल्या पाच आकृत्या होत्या. आकृत्या आणि त्यांचे पंडितजींनी सांगितलेले उच्चार नि अर्थ तुमच्यासाठी पुढे देत आहे—



च्युंग वाँन पिंग जू किन

(सर्व) (दहा हजार) (सैनिक) (आता)

" हा माणूस चिन्यांचा हेर आहे. " पंडितजी म्हणाले. " इथली माहिती तो आमच्या शत्रूला पुरवतो आहे. हे सगळं आधीपासून योजलेलं असणार ! याने पिवळ्या रंगाच्या पतंगावर संदेश लिहून तो पतंग उडवायचा आणि तो तिकडे त्यांनी वाचायचा— "

" पण त्यांना पतंग मिळणार कसा ? "

" तुम्ही जे हेलिकॉप्टर पाहिलं म्हणता, ते पतंग तोडायलाच आलेलं असेल – पण तुम यहाँ टाइम वेस्ट क्यौं करते हो ? वह आदमी किधर गया–

उसको पकडना चाहिये ! जाव— भागो जलदी ! मैंभी कमांडरसाबको खबर देता हूं ! "

" ते करा तुम्ही. पण तेवढी छडी द्या इकडे ! " असे म्हणून फास्टर फेणेने त्यांच्या हातातली चामड्याने मढवलेली छडी हिसकावून घेतली आणि तो मिरीला म्हणाला, " मिरे ! आपल्या शैतान चिंटूला मात्र संभाळ जरा ! कधी कधी त्याची मदत महागात पडते ! "

फास्टर फेणे नि हरबान वाऱ्याच्या वेगाने पळाले. दवाखान्यात त्यांनी चौकशी केली तेव्हा तिथले इन्चार्ज डॉक्टर म्हणाले, " हां ! कमांडर-साहबकाभी फोन आया है. एक माणूस पायाला आयोडिन लावून घेण्यासाठी आला होता खरा. पण मी जखम पाहून सांगितलं, नुसत्या आयोडिनवर भागायचं नाही. मांज्याने कापलं असेल तर मी जखम धुवून साफ करतो. आणि तो 'नको नको' म्हणत असता त्याला निजवून मी जखम नीट साफ केली. पट्टी बांधली. "

" आणि मग— "


" पट्टी बांधल्यावर मात्र तो क्षणभरही थांबला नाही. लंगडत लंगडत पळाला. पण – पण मी त्याचा नाव-पत्ता घेतला आहे. "

" नाव-पत्ता काय करायचा ? " फास्टर फेणे म्हणाला. " तो होईल तेवढ्यात बेपत्ता !— कोणत्या दिशेला गेला सांगा ! "

डॉक्टरांनी बोट दाखवले. लगेच ही जोडी तडातड तडातड उड्या मारीत निघाली. निघण्यापूर्वी खुंटीवर लोंबत असलेली एक दोरी हरबानने ओढून घेतली.

जंगलातल्या एका दरडीत त्यांनी त्याला गाठले. पण त्यासाठी त्यांना एवढे पळावे लागले की फास्टर फेणेच्या चपला कुठल्या कुठे उडाल्या होत्या ! हे दोघे उंचीवर होते. तो खाली उतरलेला होता. वाटेत दगडगोटे खूप होते. पाचोळाही खूप होता.

पाचोळ्याची सळसळ ऐकून त्याने मागे वळून पाहिले होते. हातात कोयता उगारलेला होता. पण फास्टर फेणेने कोयत्याची पर्वा न करता हातातली छडी फेकून दिली अन् "जय बलभीम!" म्हणून त्याच्या छातीवर झेप टाकली. दोन्ही हातांनी त्याने त्याचा गळाच दावून धरला!



त्या माणसाचा कोयता कुठच्या कुठे उडाला. आणि तो स्वतः मागच्या उतारावर कोलमडला.

तिकडे हरबानने छडी उचलली होती. तो आता दुश्मनाच्या अंगावर सपासप फटके मारू लागला. तो कितीही विवळला, किंचाळला, तरी पोरांनी त्याची पर्वा केली नाही. त्याची शक्ती पुरती गळाली तेव्हाच ते मारायचे थांबले. आणि हातातल्या दोरीने त्यांनी त्याचे हातपाय बांधले.

आणि मग हात झटकीत ते दोघे ताठ होत आहेत, तोच बंदुका घेतलेले दोघे जवान तिथे हजर झाले होते.

"ले लो!" कंबरेवर हात ठेवून फास्टर फेणेने ऐटीत घोषणा केली. "बनियन कंपूका चार नंबरका कैदी!"

# फास्टर फेणे— फू–फू–फू !

चंदरने ' महाराष्ट्र टाइम्स ' खाली ठेवला आणि डोळे वटारून माझ्याकडे पहात तो म्हणाला," कमाल आहे या फास्टर फेण्याची ! दर वेळी काही तरी नवी गडबड ठेवलेली ! आघाडीवर काय जातो, फटफटी काय चालवतो, रणगाड्यात काय बसतो– सगळीच गंमत ! पण काय हो दादा, एवढा धुडगूस घालूनही चिन्यांनी या पोराला एकदाही कसा पकडला नाही ? "

" पकडला होता." मी डोळा मिचकावून म्हणालो. " चिन्यांनी बन्याला एकदा पकडला होता. कुण्णा–कुण्णाला ते माहीत नाही. टाइम्सलासुद्धा त्याची बातमी नाही. हे लष्करी गुपित मी फक्त तुलाच एकट्याला पहिल्याने सांगतो आहे. कान कर इकडे—"

चंदरने कान इकडे केला आणि मी त्याला ही हकीगत सांगितली–

बन्या ऊर्फ फास्टर फेणे नेफा आघाडीवर असताना असाच एकदा शत्रूची बातमी काढायला गेला. एका डोंगराच्या पायथ्याशी शत्रूच्या

फौजेचा तळ पडलेला होता. खूप तंबू होते. चिनी पहारेकरी खांद्यावर बंदुका टाकून गस्त घालीत होते. छावणीभोवती उंच गवत वाढलेले होते. त्यातून लपत छपत बन्या गेला आणि तारेच्या कुंपणातून हळूच आत शिरला. त्याच्या वाळकुड्या शरीरावर एकदोन ओरखडे उठले. थोडे रक्त आले, पण त्याची बन्याला पर्वा नव्हती. त्याचे लक्ष समोरच्या राहुटीकडे होते. राहुटीवर चिनी झेंडा फडकत होता. ती चिनी सेनापतीची कचेरी होती. कोणाचे लक्ष नाही असे पाहून हळूच त्या कचेरीत घुसून शत्रूकडचा नकाशा पळवायचा असा बन्याचा बेत होता.

बन्या एक सुरकांडी मारून ती राहुटी गाठणार इतक्यात मागून त्याच्या मानेवर कोणाच्या तरी हाताची पकड बसली आणि कोणी तरी दरडावून बोलले, "फू नि मॉंग– च्यॅं च्यॅं!" म्हणजे "कसा पकडला तुला! हेः हेः!"

बन्या ताठ उभा राहिला. त्याच्या छातीत एकदम धडधड होऊ लागली. पण त्याने लगेच आपली भीती आवरली. काही झाले तरी बन्या महाराष्ट्राचा बच्चा होता. शूर मुलगा होता तो!

"तै पिंग तल च्यू–" चिनी पहारेकरी बन्याचा दंड धरून त्याला ढकलीत ओरडला. म्हणजे "चल बड्या साहेबापुढे." तुला चिनी भाषा कळत नाही; मलासुद्धा कळत नाही, तेव्हा चिनी काय बोलत होता ते मराठीतच सांगेन यापुढे तुला.

बन्यासारख्या एका लहान पोराला पकडून आणलेले पाहून छावणी-तल्या दुसऱ्या सैनिकांना फार गंमत वाटली. जो तो त्याच्याकडे आश्चर्याने पाहू लागला.

बन्याला राहुटीतून आत नेऊन पहारेकऱ्याने साहेबापुढे उभे केले. आणि तो सलाम ठोकून म्हणाला, "साहेब! हा शत्रूकडचा हेर आहे."

"अस्सं? कुठे शापडला?" साहेब म्हणाला. साहेबाला धड बोलता

येत नव्हते. कारण त्याच्या दातांत अखंड चिरूट दाबलेला असे. लठ्ठ जाडा चिरूट. हा चिनी साहेबही चिरूटासारखाच लठ्ठ नि जाडाजुडा होता, पण ठेंगणा. त्याला अखंड चिरूट फुंकणे आवडत असे. त्याच्या टेबलावर दुर्बीण, पिस्तूल अशा वस्तू तर पडलेल्या होत्याच. पण दोन लठ्ठ चिरूटही पडलेले होते. आणि एक नकाशा !



"चोरून छावणीत शिरत होता, साहेब !" पहारेकऱ्याने माहिती दिली.

वन्याचे लक्ष टेबलावर उघड्या पडलेल्या त्या नकाशाकडे लागले होते. पण साहेबाला ते कळले. तो ओरडला, "नक्षा चाहिये क्या? अरे तेरा नक्षा उतरूंगा ! क्या समजा? हमारा कैदी है तुम !–" आणि त्याने चिनी भाषेत आपल्या शिपायाला काही तरी हुकूम दिला आणि दणकन् पाय आपटले.

त्याने हुकूम असा दिला होता, की "या पोरट्यावर नजर ठेवा आणि त्याच्याकडून काही तरी काम करून घ्या !"

तेवढा हुकूम सोडून साहेबांनी बन्याकडे पाठ वळवली होती. चिरुटातून भप्‌भप् भपकारे सोडीत ते भिंतीवर टांगलेला दुसरा मोठा नकाशा पाहण्यात गुंतले होते. बन्याला पकडून आणणारा पहारेकरी आणि राहुटीतले शिपाई एकमेकांशी काही तरी बोलत होते. 'या छोट्या पोराला कोणते काम सांगावे ?' अशी त्यांची चर्चा चालू होती.

एक क्षणभर कोणाचेही लक्ष नव्हते. तेवढी संधी साधून बन्याने आपला हात पटकन् पुढे नेला. साहेबांच्या खांद्यावर चामड्याचा एक चमकदार रुंद काळा पट्टा अडकवलेला होता. आणि त्यात पिस्तुलाच्या गोळ्यांची माळच्या माळ होती. माळ जरा ढिलीच होती. बन्याने शिताफीने त्यातली एक सैलसर गोळी ओढून घेतली. डोळ्यांचे पाते लवते न लवते तो बन्या पुन्हा ताठ उभा राहिला.

"टॉंग भॉंग फॉं !" असे काही तरी ओरडून साहेब तिथून दुसऱ्या कामाला निघून गेले.

चिनी शिपाई ओरडला, "इधर आव ! तुमकू काम देता हूं !"

बन्या त्या शिपायाकडे गेला. शिपायापुढे एक छोटे टेबल होते. टेबलावर एक डझन चिरूट होते. काही पत्रे पडलेली होती. शाईची दौत होती. गोंदाची बाटली होती.

"तू बोलून चालून पोरगा ! तुला कसलं काम देणार आम्ही ? तू आपला हे सोपं काम कर ! हे आमच्या साहेबांचे चिरूट. त्यांची टोकं उडवून ठेवायची. हा घे चाकू. मात्र चाकूचा दुसरा काही उपयोग केलास तर खबरदार ! आमची नजर आहे तुझ्यावर !"

आणि असे म्हणून त्या शिपायाने चिरुटाचे टोक कसे उडवायचे ते बन्याला शिकवले. हुशार मुलगा जसे मास्तरांनी सांगितलेले सगळे लक्ष देऊन

ऐकतो, तसे बन्याने ऐकले. मग तो चाकू घेऊन कामाला लागला. दोघेही शिपाई एकमेकांशी गप्पा मारीत उभे राहिले.

बन्याने एका चिरुटाचे टोक उडवले. तो बाजूला ठेवला. दुसऱ्याचे उडवून तोही बाजूला ठेवला. मग तिसरा घेतला—

शिपायांचे लक्ष नाही असे पाहून बन्याने मघाशी पळवलेली पिस्तुलाची ती गोळी मुठीतून टेबलावर ठेवली. काडतूस ! त्या काडतुसाचे टोपण त्याने चाकूने तासून उरलेल्या तिसऱ्या चिरुटाचे टोक उडवून आतली तंबाखू टेबलावर ओतली, आणि चिरुटातल्या पोकळीत ती पिस्तुलाची गोळी भरली. मग टोक बंद करून त्याने गोंदाच्या बाटलीतला ब्रश घेऊन त्याने ते पटकन् चिकटवून टाकले !

हे सगळे त्याने किती झपाट्याने केले म्हणतोस !

त्यानंतर बाकीच्या चिरुटांची टोकेही उडवून बन्याने सर्व चिरूट बाजूला मांडून ठेवले. त्यांत सर्वांत वरती तो चिरूट ठेवला.

इतक्यात खाड्–खाड्–खाड् ! साहेबांची पावले वाजली. दोन्ही शिपाई ताठ झाले. एकजण ओरडला, " झालं की नाही काम ? "

" झालं, हवालदार ! " बन्या म्हणाला.

साहेब आले ते आरडाओरडा करीत– घुश्श्यात !

" चिरूट !– चिरूट !– " ते किंचाळत होते. त्यांचा चिरूट जळून संपला होता. नवीन हवा होता. म्हणून ते तडफडत होते.

लगेच शिपायाने टेबलावरचा चिरूट उचलला आणि साहेबांपुढे केला. तो सर्वांत वरचा चिरूट !

साहेबांनी आ केला आणि ते ओरडले, " च्याम लांग ले बुटिंग ! " म्हणजे, " तोंडात घाल की गाढवा ! "

तेव्हा शिपायाने साहेबांच्या तोंडात तो चिरूट घातला. दुसरा शिपाई धावत पुढे आला. त्याने काडी शिलगावून चिरुटाला लावली.

बन्या हे सर्व पहात होता. बारीक डोळ्यांनी, किलकिल्या डोळ्यांनी. चिनी माणसासारखे बन्याचे डोळे बनले होते.



दुसऱ्याच क्षणी वन्याने वूम–जाव केले. अबाउट टर्न !

राहुटीचे कापडी दार उघडून तो धूम पळत सुटला.

तिकडे मागे मोठा स्फोट झाला होता– धडाड् धुम् ! चिनी छावणीत एकच गडबड उडाली होती. जो तो साहेबांच्या राहुटीकडे धावत होता. पण साहेबांचे काय झाले हे मागे वळून पाहण्यासाठी वन्या थांबलाच नाही.

वन्या ऊर्फ फास्टर फेणे सारखा पळत सुटला.

आपल्या सैन्याची छावणी गाठल्यावर मगच वन्या थांबला. थांबला म्हणजे काय, धापा टाकीत बेशुद्ध पडला ! त्याच्या जवान मित्रांनी त्याला शुद्धीवर आणले.

"आणि तो चिनी अधिकारी आणि तो शिपाई–" चंदर म्हणाला, "त्यांचं काय झालं हो दादा ? ते ठार झाले ?"

"कुणास ठाऊक त्यांचं काय झालं ते !" मी म्हणालो, "सांगतो ना– वन्याचा हा पराक्रम अजून जाहीर झालेला नाही. आपल्या सरकारने हे लष्करी गुपित अजून बाहेर फोडलेलं नसावं आणि चिनी सरकार कशाला हे बाहेर फोडील ? एका लहान पोऱ्याने आपल्या सेनापतीची फजिती केली हे जगाला सांगतील का ते ? तेव्हा आळी मिळी गुपचिळी !"

"पण–" चंदर म्हणाला, "हे सगळं खरं का हो ? फास्टर फेणे नावाचा खरा मुलगा आहे ?"

"हे बघ–" मी एकदम गंभीर बनून म्हणालो, "फास्टर फेणे म्हणजे काही तरी अद्‌भुत आहे का ? मुळीच नाही ! फास्टर फेणे एक वाळकुडा मुलगा. पण चलाख आणि चपळ ! किडकिडीत पण तुडतुडीत ! तुझ्या-सारखा– तुझ्या किती तरी मित्रांसारखा. तुम्ही आघाडीवर गेला असता तर जशी धडपड केली असतीत तशीच तो करतो आहे. मग फास्टर फेणे खरा नाही असं म्हणशील का पुन्हा ? – बोल !"

म. ग्रं. सं. ठाणे, वाचना
वा. क्र. ९६०६४ नों. f
वि. ........... ........ ह..
IRBK-0116084
IRBK-0116084